# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ३५ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त// (ऑनलाईन अॅपव्दारे) दिनांक : १५/०९/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**१५/०९/२०२० मंगळवार** रोजी सकाळी **११.००** वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/ नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग व्दारे) स्थायी समिती सभापती अॅड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.अॅड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | पाटील राजेंद्र झिपरु |
| ढेकळे सदाशिव गणपत | काळे रेश्मा कुंदन |
| पोकळे दिलीप बबनराव | लढढा नितीन बालमुकुंद |
| कोल्हे प्रविण रामदास | भंगाळे विष्णु रामदास |
| सनकत चेतन गणेश | बरडे नितीन मनोहर |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, मा.उपायुक्त श्री. संतोष वाहुळे, मा.मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे व अधिकारी उपस्थित होते.

**वंदेमातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**श्री.दिलीप पोकळे :-** आवाज येत नाही. वंदेमातरम पण ऐकु आल नाही. गोराणे साहेब काय बोलत आहे आम्हाला कळत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** वंदेमातरम आम्हाला सुध्दा ऐकु आल नाही. आणि फक्त स्क्रिन वरती जेव्हा सभापती खाली बसले तेव्हा आम्हीपण खाली बसलो.

**श्री.चेतन सनकत :-** आम्हाला काही ऐकु आल नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया,

**श्री.सदाशिव ढेकळे :-** हॅलो हलो, सभापती महोदया, ऐकायला येत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ढेकळे बाबा जय महाराष्ट्र.

**श्री.नितीन बरडे :-** हॅलो, हॅलो

**श्री.नितीन लढढा :-** आवाजला काय प्रॉब्लेम आहे. ढेकळे साहेब, ढेकळे साहेब.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** हा.

**श्री.नितीन लढढा :-** आपल्या राज्यात काय चालु आहे हे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सत्ताधारींच्या राज्यात तर वंदेमातरमचा आवाज ही ऐकु येत नाही.

**श्री.चेतन सनकत :-** आवाज ऐकु येत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता घ्या बॅटरी डाऊन होतील तोपर्यंत जर आवाज येत नसेल तर कस होईल. सभापती महोदया, सभापती महोदया,

**श्री.नितीन बरडे :-** भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अहो नगरसचिव महोदय,

**नगरसचिव :-** भाऊ आवाज आला का? आला आवाज.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो येत आहे.

**नगरसचिव :-** पोकळे साहेब आवाज आला का ?

**श्री.दिलीप पोकळे :-** आवाज येत आहे पण ईको फार येत आहे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांचे सभेमध्ये स्वागत आहे. आवाज येत आहे का ?

**श्री.दिलीप पोकळे :-** आवाज येत आहे पण ईको फार जास्त येत आहे.

**नगरसचिव :-** नितीन भाऊ आदरणीय नितीन भाऊ आवाज येत आहे ना ?

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (३) व (४) चे तरतूदीनूसार स्थायी समितीमधील आठ सदस्य निवृत्त करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** विषय मान्य आहे.

**मा.सभापती :-** बोला चेतन भाऊ.

**श्री.चेतन सनकत :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया, विंनती करतो की, जे जेष्ठ आठ सदस्य निवृत्त होतील त्यांना जर पुनश्च संधी दिली तर त्यांचा अनुभवाचा फायदा होईल महापालिकेला.

**मा.सभापती :-** नक्की नितीन भाऊ. तुमच्या या सुचना मी नगरसचिव यांना देते. आणि त्यांना सांगेल की, हा विषय युध्दपातळीवर घ्या.

**श्री.नितीन लढढा :-** कारण कस आहे त्यांच अनुभव निश्चितपणे कामाला येईल. काही लोकं निवृत्त करा. भलेही नव्याने दोन चार लोकांना संधी द्या. आणि बाकीचे जे अनुभवी आहे तर त्यांच्या अनुभवाचा निश्चित फायदा होईल.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रस्तावास अनुमोदन आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** सभापती महोदया,

**मा.सभापती :-** बोला, बोला बोला ढेकळे दादा. बोला ढेकळे दादा बोला.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२७३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०(३) व (४) च्या तरतुदीनुसार स्थायी समितीच्या सदस्यापैकी निम्मे सदस्य प्रत्येक वर्षी निवृत्त करणे व त्यांच्या जागी नविन सदस्य नेमणुक करुन स्थायी समितीचे पुर्नगठन करणे अनिवार्य आहे.

अधिनियमाचे कलम २०(३) चे तरतुदीस अनुसरुन स्थायी समितीच्या सदस्यापैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील.

स्थायी समितीचे गठनाचे ३ रे वर्ष असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०(३) नुसार मुळ गठीत स्थायी समितीमधील आठ सदस्य हे कलम २० (४) चे तरतुदीनुसार त्यानतरच्या (वित्तीय वर्षानंतरच्या) पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळापर्यंत असतील ते निवृत्त होतील अशी तरतुद असल्यामुळे खालील नमुद केलेले स्थायी समिती सदस्य यांना दि.०१/१०/२०२० रोजी दुपारी स्थायी समितीमधुन निवृत्त करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

स्थायी समितीमधुन निवृत्त होणाऱ्या सदस्यांचे नावे खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १.ॲड हाडा शुचिता अतुलसिंह | २.पोकळे दिलीप बबनराव |
| ३.कोल्हे प्रविण रामदास | ४.खडके सुनिल वामनराव |
| ५.सनकत चेतन गणेश | ६.बालाणी भगतराम रावलमल |
| ७.ढेकळे सदाशिव गणपत | ८.भंगाळे विष्णू रामदास |

वरील आठ सदस्य निवृत्त झालेनंतर त्यांचे जागेवर नविन आठ सदस्यांची नियुक्ती करणे संबंधात नियमाच्या तरतुदीस अनुसरुन विषय महासभेपुढे ठेवण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर रिक्त झालेल्या पदांवर सदस्य निवडीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील तरतुदीनुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही सत्वर करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्रं.१३ मधील मेहरुण स.नं.४५२ संभाजी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे कामी मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.१०% कमीचे दरानुसार रक्कम रु.५०,२४,३९९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.सभापती :- बोला नवनाथ भाऊ बोला.**

**श्री.विष्णु भंगाळे :- सभापती महोदया,**

**मा.सभापती :-** बोला विष्णु भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** विषय क्र.२,३,४ हे सारखेच विषय आहे.

**नगरसचिव :-** बोला आदरणीय नितीन भाऊ बोला.

**श्री.नितीन लढढा :-** विषय क्र.२,३,४ हे सारखेच विषय असल्याकारणाने मान्यता देण्यात यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्रं.१३ मधील मेहरुण स.नं.४५२ संभाजी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणेच्या कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर./२६८/२०२० दि.०५/०३/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.१३/०३/२०२० च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.३६/०७ सन २०२०-२१ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१२२ दि.१५/०५/२०२० चे पत्रान्वये दै.देशदुत या वर्तमान पत्रात दि.१६/०५/२०२० रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत संगणकाव्दारे ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित केलेले आहे. त्यानुसार ई निविदा फोल्डर क्रं.०२ ओपन करुन मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| **अ.क्रं.** | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.५०,२९,४२८/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | शिवाजी गणपत भंगाळे | निविदा रक्कमेपेक्षा ०.१०% कमीचे दराने | ५०,२४,३९९/- |
| २ | मे.सनवर स्टोन मेटल<br>प्रोपा शेख सनवर शेख सत्तार | निविदा रक्कमेवर ४.९९% जास्तीचे दराने | ५२,८०,३९६/- |

वरिल तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ०.१०% कमीचे सर्वात कमी आलेले दर स्विकृत करणेस व त्यानुसार सदर कामी येणारा रक्कम रु. ५०,२४,३९९/-मात्र चा खर्च हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन करणेस तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ७ मधिल नियम ७३ (क) नुसार संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्र. ३:-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्रं.१३ मधील मेहरुण स.नं.४५५/४,४६० रायसोनी नगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणे कामी मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.०१% कमीचे दरानुसार रक्कम रु.७८,९०,२३९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्रं.१३ मधील मेहरुण स.नं.४५५/४,४६० रायसोनी नगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणेच्या कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर./२६८/२०२० दि.०५/०३/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.१३/०३/२०२० च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.३६/०६ सन २०२०-२१ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१२२ दि.१५/०५/२०२० चे पत्रान्वये दै.देशदुत या वर्तमान पत्रात दि.१६/०५/२०२० रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत संगणकाव्दारे ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित केलेले आहे. त्यानुसार ई निविदा फोल्डर क्रं.०२ ओपन करुन मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्र | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.७८,९१,०२८/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | शिवाजी गणपत भंगाळे | निविदा रक्कमेपेक्षा ०.०१% कमीचे दराने | ७८,९०,२३९/- |
| २ | मे.सनवर स्टोन मेटल<br>प्रोपा शेख सनवर शेख सत्तार | निविदा रक्कमेवर ४.९९% जास्तीचे दराने | ८२,८४,७९०/- |

वरिल तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ०.०१% कमीचे सर्वात कमी आलेले दर स्विकृत करणेस व त्यानुसार सदर कामी येणारा रक्कम रु. ७८,९०,२३९/- मात्र चा खर्च हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन करणेस तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ७ मधिल नियम ७३ (क) नुसार संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्र.** ४:- नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्रं.१३ मधील रायसोनी नगर मधील १२ मी विकास योजना रस्ते कॉंक्रीटचे करणे कामी मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.०१% कमीचे दरानुसार रक्कम रु.७४,८७,४४०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्रं.१३ मधील रायसोनी नगर मधील १२ मी विकास योजना रस्ते कॉंक्रीटचे करणेच्या कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर./२६८/२०२० दि.०५/०३/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.१३/०३/२०२० च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.३६/०८ सन २०२०-२१ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१२२ दि.१५/०५/२०२० चे पत्रान्वये दै.देशदुत या वर्तमान पत्रात दि.१६/०५/२०२० रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत संगणकाव्दारे ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास

नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित केलेले आहे. त्यानुसार ई निविदा फोल्डर क्रं.०२ ओपन करुन मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.७४,८८,१८९/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | शिवाजी गणपत भंगाळे | निविदा रक्कमेपेक्षा ०.०१% कमीचे दराने | ७४,८७,४४०/- |
| २ | मे.सनवर स्टोन मेटल<br>प्रोपा शेख सनवर शेख सत्तार | निविदा रक्कमेवर ४.९९% जास्तीचे दराने | ७८,६१,८५०/- |

वरिल तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ०.०१% कमीचे सर्वात कमी आलेले दर स्विकृत करणेस व त्यानुसार सदर कामी येणारा रक्कम रु. ७४,८७,४४०/- मात्र चा खर्च हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन करणेस तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ७ मधिल नियम ७३ (क) नुसार संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्र. ५:-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२१ करीता श्री.पवन पंढरीनाथ चौधरी यांची कंत्राटी तत्वावर सिटी कॉर्डीनेटर म्हणून जळगांव शहर महानगरपालिकेत अटी शर्तीस बंधनकारक राहुन करार तत्वावर ६ महिने करीता तात्पुरती नियुक्ती करणे व रक्कम रु.१,८०,०००/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** पवन पंढरीनाथ चौधरी यांची मुदत किती तारखेला संपलेली होती.

**श्री.कपील पवार मुलेप :-** दि.३१ मार्च पर्यंत मुदत होती.

**श्री.राजेंद्र पाटील :-** यांची मुदत संपण्या आधी आपण सभागृहाची मान्यता का नाही घेतली.

**श्री.कपील पवार मुलेप :-** मी पण तेच विचारल होत विभागाला की, मान्यता का नाही घेतली. तर ती टिप्पणी प्रोसेस मध्ये होती आहे. आणि त्या टिप्पणीला उशीर झाला. आणि या कोरोनाच्या काळात आरोग्य विभागात पुष्कळ कर्मचारी पॉझीटीव्ह झालेले आहेत. त्यामुळे टिप्पणी ठेवायला उशीर झाला.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपण हे बघा कोविडचा विषय किती तारखेपासुन सुरु झालेला आहे.

**श्री.कपील पवार मुलेप :-** काय म्हणता.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आरोग्यच काय सांगत आहे आपण.

**श्री.कपील पवार मुलेप :-** कोविड आपल २१ मार्च पासुन सुरु झालेल आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** यांची मुदत कधी संपणार होती.

**श्री.कपील पवार मुलेप :-** यांची मुदत ३१ मार्चला संपणार होती.

**मा.सभापती :-** येथे लिहलेले आहे की, १७ मार्च २०२० रोजी आदेश संपुष्टात आल्याने.

**श्री.कपील पवार मुलेप :-** आता गॅप दिलेला आहे मॅडम त्यांना. आणि आता ०१/०४/२०२० पासुन त्यांची नियुक्ती आहे. आणि फक्त सहा महिन्यासाठी करायचे आहे आपल्याला ते.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्यांची जर १७ मार्चला मुदत संपत होती तर त्याच्या आधी तुम्ही हा विषय सभागृहापुढे का नाही आणला ? न आणण्याचे कारण काय ? १७ मार्च पुर्वी हा विषय सभागृहापुढे न आणण्याचे कारण काय ?

**श्री.कपील पवार मुलेप :-** याच्यामागे दोनच बाबी होते.एक फाईल आरोग्य विभागातच पडुन राहिली. आणि दुसर कोरोनाच्या पार्श्वभुमीवर कर्मचारी नसल्यामुळे त्यांना ही फाईल लवकर पुटअप करता आली नाही.

**श्री.राजेंद्र पाटील:-** बर आता त्यांची मुदत केव्हा संपणार आहे. हे रिन्युव्हेशन जे द्यायच म्हणत आहात तुम्ही याची मुदत केव्हा संपणार आहे.

**श्री.कपील पवार मुलेप :-** आता ६ महिन्यासाठी आपण त्यांना मुदतवाढ देत आहोत आणि शासनाकडुन आपण हे पद समन्वय हे पदाची मागणी करत आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ही आपण मुदतवाढ देत आहोत ज्याच्यासाठी आपण मागणी केली मुदतवाढची ती मुदत कधी संपणार आहे.

**श्री.कपील पवार मुलेप :-** ती दि.३०/०९/२०२० पर्यंत.

**श्री.राजेंद्र पाटील :-** म्हणजे या महिन्याच्या ३० तारखेला, मुदत संपायला १० दिवस राहिलेले आहे मला वाटत.

**श्री.कपील पवार, मुलेप :-** हो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** म्हणजे संपुर्ण मुदत संपेपर्यंत तुम्ही मुदतवाढ घेतलेली नाही.

**श्री.कपील पवार, मुलेप :-** हो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** म्हणजे प्रशासनाने काय ठरविलेल आहे की, तुम्ही कुठलाही विषय आमच्याकडे आणला तर मंजुर करणार असे गृहीत धरुन ठेवलेल आहे का ?

**श्री.कपील पवार, मुलेप :-** याला विलंब का झाला याची वस्तुस्थिती मी आपल्या समोर मांडली. या विलंब याच्यासाठी झाल की, ही फाईल प्रोसेस मध्ये होती. दुसर कोविड मुळे. विलंब का झाला ते सांगितल्यानंतर आपल्यासमोर फाईल ठेवलेली आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मुदत संपल्यानंतर तुम्ही नविनच प्रक्रिया राबवायला पाहिजे होती. नविन जाहिरात काढुन नविनच सर्वांना बोलावण झाल असत.

**श्री.कपील पवार मुलेप :-** हे समन्वय पद आहे. हे शासनामार्फतच भरल जात.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता याच्यावर लेखाधिकारी आहे त्यांचे काय म्हणणे आहे. आपण करु शकतो अस ? आता त्यांची मुदत संपुन जवळ जवळ ६ महिने झालेले आहे. त्याच्यानंतर त्यांना आपण मुदतवाढ देत आहे. लेखाधिकाऱ्यांनी त्यांच म्हणण मांडाव.

**श्री.कपील पवार मुलेप :-** सर म्हणजे त्यांनी या काळात काम केलेल आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तुमच आवाज क्लीयर येत नाही. आवाज समजत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** लेखाधिकारींनी द्याव उत्तर.

**श्री.नितीन लढढा :-** राजु भाऊ मला काय वाटत की, जर काही शंका असेल तर तो प्रस्ताव तहकुब ठेवावा. पुढच्या मिटींगला अभ्यास करुन प्रस्ताव मागवावा.संपुर्ण कारणांसोबत जर प्रस्ताव आला ना तर निर्णय घेणे सोपे राहील.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्यांची मुदत परत ३० तारखेला संपणार आहे. तो पर्यंत आपली स्थायी निघाली पाहिजे.

**श्री.नितीन लढढा :-** निघेल ना निघेल, कारण शेवटची स्थायी १ तारखेपर्यंत काढु शकतील ताई.

**मा.सभापती :-** १ तारखेपर्यंत स्थायी काढण्यात कोणतीही अडचण नाही. आता आपल्याला काही टेक्नीकल अडचण आलेली आहे म्हणुन एका वेळेला सभागृहात सगळयांना बोलता येत नाही. लॅपटॉप आम्हाला शिफ्ट कराव लागत आहे. या विषयाबाबत मला सर्व सदस्यांना माहिती अशी द्यायची आहे की, यांची नियुक्ती झालेली होती सिटी कॅरडीनेटर म्हणुन डॉकेटनुसार त्याची मुदत संपते दि.१७ मार्च २०२० ला. जेव्हा १७ मार्च २०२० ला मुदत संपली. प्रशासनाने जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात या प्रकरणाची पुर्तता करायला हवी होती. त्याची जी पुढची प्रोसिजर आहे ती राबवायला हवी होती. कोरोनाच कारण जे आता येथे सांगितल जात आहे. मला वाटत २५ तारखेपासुन पहिला लॉकडाऊन आपला सुरु झाला.आणि २२ मार्चला आपण एक दिवसाचा लॉकडाऊन पाळलेला होता. म्हणजे १७ मार्चला यांची मुदत संपलेली होती. त्यापुर्वी हे प्रकरण प्रशासनाने का फिरविले नाही. प्रशासकीय टिप्पण्यांमध्ये हे प्रकरण अटकलेल होत थांबलेल होत. म्हणुन झाल नाही. हे कारण आता आपल्याला सांगितल जात आहे. या मध्ये मुख्य लेखा परिक्षकांची एक टिप्पणी सुध्दा आहे. सदर खर्चाच्या मान्यतेसाठी हा प्रस्ताव सादर झालेला आहे स्थायी समोर. त्या वेळेला याच्यावर मु.ले.प. यांची टिप्पणी आहे. यांना कार्यादेश दिलेले नसतांना यांना पुर्ननियुक्ती दिलेली नसतांना हा खर्च कशा पध्दतीने करता येईल. यांची नियुक्ती दि.०१/०४/२०२० ते दि.३०/०९/२०२० रोजीपर्यंत नमुद केलेली आहे. सदर व्यक्तीचे आदेश यापुर्वी का काढले नाही, विलंबाचे कारण का ? असे मुख्यलेखा परिक्षकांचा या फाईलवर शेरा आहे. कामाची निकड पाहता प्रशासनाने खुलासा दिलेला आहे की, हे काम महत्वाच आहे. निश्चित हे काम महत्वाच आहे. आपल्याला जे वेगवेगळे स्वस्त्रातले निधी येत असतात. स्वच्छ भारत सर्वेक्षण किंवा इतर स्वच्छता संदर्भात शासनाकडुन राबविले जाणाऱ्या उपक्रमाबाबत अपग्रेड करणे शासनाला या संदर्भातल काम या पदावरील व्यक्ती करत

असत. याचे निवड प्रक्रियेकडे पुर्ननियुक्तीकडे प्रशासनाने दुर्लक्ष का केल. वारंवार हेच म्हणण आहे आता हे स्टीन वर्क झालेल आहे प्रशासनाच. मुदत संपु द्यायायची त्यानंतर प्रस्ताव तयार करायचा, तसच रेटुन न्यायच आणि समिती समोर पाठवुन द्यायच मान्यतेसाठी. मागे जेव्हा वॉटरग्रेस कंपनीच जेव्हा स्वच्छतेच काम थांबल आणि आपल्याकडे बांधकामचा जो मंजुर निविदा धारक होता. त्याला काम देण्यात आल.या संदर्भात ही सुध्दा ती तात्पुरती व्यवस्था होती. या संदर्भात सुध्दा मी पुर्वी आक्षेप नोंदविलेला आहे. तात्पुरती व्यवस्था आहे मान्य होत. पण त्यानंतर प्रशासनाने निविदा प्रक्रिया जर राबविली नाही. तेव्हा ही त्या बांधकामच्या मक्तेदाराची मुदत संपुन गेली तेव्हाही ते काम तसच सुरु राहिल. प्रशासनाकडुन ही अश्या प्रकारची अनियमितता सुरु आहे. आणि येथे खरोखर ॲब्जेक्शन घेणे योग्य आहे. लेखापरिक्षणामध्ये सुध्दा स्ट्राँग ॲब्जेक्शन नोंदविल जाऊ शकतो. पवार साहेब तुम्ही खुप कर्तव्यदक्ष आधिकारी आहात माझी तुम्हाला विनंती आहे या संदर्भात हे जे सगळे अश्या पध्दतीचे कामे सुरु आहे. हे काम जर थांबवल किंवा याला मान्यता दिली नाही. आता आपण जस सांगितल की, या व्यक्तीने या पदावरच काम प्रामाणिकपणे गेल्या सहा महिने केलेल आहे. मग त्या व्यक्तीवर अन्याय होणार. या प्रस्तावाला स्थायी समितीने जर मान्यता दिली नाही तर या व्यक्तीवर अन्याय होणार. त्याला त्याच पगार मिळु शकणार नाही. त्यामुळे ही तुमची जबाबदारी आहे. शेवटी ही आमची जबाबदारी आहे म्हणुन आम्ही हे थांबविणार नाही. परंतु अशीच मनमानी चालु द्यायची का ? साहेब मी तुमच्या पुन्हा निदर्शनास आणुन देऊ ईच्छिते. असे हे सगळे प्रकरणात होत आहे. आधी मी बांधकामच्या प्रकरणात सुध्दा लक्षात आणुन दिल होत की, मक्तेदाराची मुदत संपत आहे. निविदा प्रक्रिया सुरु आहे. खडके साहेब बरोबर आहे हे ? त्याच्यात सुध्दा तुम्हाला अडचणी येत आहे. निविदा प्रक्रिया सुरु असतांना काय होत. आता घडीला आपल्याकडे बांधकामचे मजुर नाही, ट्रॅक्टर नाही. या संदर्भातले आपले जे काम आहे. स्वच्छतेचे ट्रॅक्टरवर वापरावे लागत आहे. किंवा ते काम करुन देऊ शकत नाही. हे अस वारंवार का होत आहे. प्रशासन लोकप्रतिनिधींना गृहीत धरते का ? आम्ही मुदत संपु देणार मुदत संपल्यानंतर आम्ही प्रस्ताव बनवुन पाठविणार. त्याचे काही तरी थातुरमातुर कारण देऊन देणार. शेवटी लोकप्रतिनिधींनी जनहिताचा विचार करुन आमच प्रकरण मंजुर करा. या प्रमाणे येथे प्रशासनाची कार्यपध्दती दिसुन येत आहे. आणि मी सभापती म्हणुन याच्यावर आक्षेप घेत आहे.

**श्री.कपील पवार मुलेप :-** मा.सभापती यांनी जे काही सांगितल, या सर्व बाबींची मी नोंद घेतो आणि हा जो प्रस्ताव आहे. मा.स्थायी समितीने अमान्य करावा. अमान्य करुन पुढच्या वेळेस आमच्या कडुन अशी चुक होणार नाही. कोणतीही बाब आम्ही काळजीपुर्वक करु. याची आम्ही दक्षता घेऊ.

**मा.सभापती :-** हा प्रस्ताव जर स्थायी समितीने अमान्य केला, तर ज्या व्यक्तीने या पदावर काम केलेल आहे. त्याला आता पगार द्यायचा आहे. या संदर्भात प्रशासनाच काय नियोजन आहे. म्हणजे या व्यक्तीवर अन्याय होणार नाही का ? प्रशासनाच्या दिरंगाईमुळे प्रशासनाच्या चुकांमुळे. त्या व्यक्तीने सहा महिने काम केलेले आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, सभापती महोदया,

**मा.सभापती :-** बोला दादा बोला,

**श्री.चेतन सनकत :-** आवाज येत नाही. इको बंद करा.

**मा.सभापती :-** प्रशासनाने आता राजेंद्र पाटील साहेबांनी जे मत व्यक्त केलेल आहे. ते अतिशय योग्य आहे. शेवटी लोकप्रतिनिधी म्हणुन आमची जबाबदारी वेगळी असते. त्या व्यक्तीने जेव्हा महानगरपालिकेच इतक महत्वाच काम केलेल आहे. मला वाटत स्वच्छ भारत अभियानामध्ये जे आपल रँकींग अपग्रेड झाल. त्या कामी सुध्दा आपल्याला त्या कामात त्यांची मदतच झालेली आहे. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय करण्याचा आमचा कोणताही मानस नाही. प्रशासनाने जरी ही अनियमितता केलेली असली. तरी सुध्दा आम्ही हा प्रस्ताव आमचे सगळे आक्षेप नोंदवुन मान्य करत आहोत. मात्र याच्या पुढे प्रशासनाचे कोणतेही असे अनियमितता असलेले प्रस्ताव आम्हाला गृहीत धरुन पाठवु नये. याची प्रशासनाने नोंद घ्यायची आहे. आणि पवार साहेब माझी तुम्हाला येथे सुचना असणार आहे की, एस.के. कॉन्ट्रॅक्टरचा या मक्तेदाराचा जो विषय आहे. या संदर्भातल्या ज्या संविदा स्थायी समिती म्हणुन आम्ही स्थायी समितीच्या अजेंडयावर घेण्याच नाकारलेल आहे. त्याच कारण सुध्दा प्रशासनाला लेखी कळविलेल आहे की, या मध्ये एक प्रचंड अनियमित्ता आहे. तर आपण एक जबाबदार आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणुन याची देयक देण्यापुर्वी ही सगळी अनियमित्ता तपासावी. याची जबाबदारी बघावी. कारण प्रशासनावर या संदर्भातली खुप मोठी जबाबदारी येणार आहे. येथे हे लक्षात ठेवाव. हा प्रस्ताव आम्ही मान्य करीत आहोत. मात्र येथुन पुढे अशी अनियमित्ता असणारे प्रस्ताव मान्य केले जाणार

नाही. हा विषय मान्य करण्याच एकमेव कारण आहे की, पवन पंढरीनाथ चौधरी या व्यक्तीवर अन्याय होऊ नये म्हणुन हा प्रस्ताव प्रशासनाचा चुकीचा असुन ही आम्ही मान्य करीत आहोत.

**नगरसचिव :-** नितीन भाऊ, आदरणीय नितीन भाऊ.

**मा.सभापती :-** बोला नितीन भाऊ, आपला माईक ऑन करा.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया, आता आपण म्हटलात की, चुकीचा प्रस्ताव आपण मान्य करत आहोत. काय होईल याच्याने चुकीचे परिणाम पडतील. म्हणजे आपण जरी म्हटल की, प्रशासनाने आम्हाला गृहीत धरु नये. परंतु प्रशासनाने गृहीत धरुनच प्रशासनाचा प्रस्ताव हा सभागृहासमोर आणलेला आहे. आणि त्याच्यावर सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र पाटील असतील चेतन सनकत असतील. यांनी त्यांच्या चर्चेतुन हा प्रस्ताव अमान्य करावा अशी भुमिका मांडलेली आहे. परंतु तरी आपण चुकीचा प्रस्ताव अश्या पध्दतीने मान्य केला तर प्रशासनाला पुन्हा अश्या पध्दतीने काम करत राहण्याची संधी आपण उपलब्ध करुन देत असाल. अश्या पध्दतीने तो एक मॅसेज जाईल. तर कदाचित मला वाटत तो तहकुब करुन याच्या संदर्भातली सगळी लेखी कारणे ही प्रशासनाकडुन येणे अपेक्षित आहे की, नेमके त्याच्यामध्ये अश्या पध्दतीने मुदत संपण्यापुर्वी प्रस्ताव या सभेसमोर का येत नाही. हे आता नाही. यापुर्वी ही बऱ्याच वेळेला घडलेल आहे. आपण जे.सी.बी.च्या टायरच्या संदर्भात बोललो होतो. घनकचरा प्रकल्पावरचे जे.सी.बी. त्यांचे टायरची परिस्थिती आज आपण डोळयांनी बघाल तर अक्षरश: मी म्हणतो की, त्या टायरांचे चिथडे चिथडे झालेले आहे. मागील १९/०८/२०२० च्या सभेमध्ये या सदंर्भातली संपुर्ण वस्तुस्थिती आपण सभागृहाला निदर्शनास आणुन दिलेली आहे. परंतु अद्यापपावेतो त्या जे.सी.बी.ला टायर उपलब्ध झाले नाही. आज त्याच्यामध्ये एका महिन्याचा कालावधी झाला. आणि पुर्वीचा कालावधी हा जवळ पास ११ महिने लोटला आहे. जर अश्या पध्दतीने कामाची गती असेल. तर निश्चितपणे जे लोक आपल्याला जाब विचारतात वृत्तपत्राच्या माध्यमातुन त्याला आपण उत्तर काय देणार ?

**मा.सभापती :-** बरोबर आहे नितीन भाऊ आपल म्हणण अगदी रास्त आहे. आमचा हा प्रस्ताव मंजुर करण्यामागे एकच उद्देश होता. त्या पदावर काम केलेले व्यक्तीवर अन्याय होऊ नये. प्रशासनाच्या चुकीने त्यांच्यावर अन्याय होऊ नये हा एकच उद्देश होता. चेतन भाऊ बोला, बोला चेतन भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया,

**श्री.चेतन सनकत :-** विष्णु भाऊ एक मिनीट मला परवानगी दिलेली आहे.

**मा.सभापती :-** विष्णु भाऊ थांबुन जा.

**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.नितीन भाऊ बोलले त्यांचा म्हणण्यावरुन मी माझे मत मांडतो. मी हा प्रस्ताव अमान्य करा असे बोललेलो नाही. आम्हाला आवाज ऐकु येत नाही. काही ही समजत नाही. इको बरोबर करा. मी हे विषय बोललेलो आहे. तरी तशी काही गैरसमज करुन घेऊ नये. पक्षाचा जो आदेश असेल त्याप्रमाणे जर तुम्हाला प्रस्ताव मान्य करायचा असेल तर मान्य करा. पक्षाच्या भुमिकेच्या विरोधात आम्ही नाही. आम्ही पक्षासोबत आहोत.

**मा.सभापती :-** विष्णु भाऊ बोला.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, आयुक्त साहेब, सभापती महोदया, आता म्हटल आपण चुकीचा असल्यावर आपण मान्य करत आहे. आणि याची प्रोसिडींगला नोंद होत आहे. तर हे योग्य वाटत का ?

**मा.सभापती :-** याच्या मागच कारण मी दिल विष्णु भाऊ आपल्याला, त्या पदावर काम केलेले व्यक्तीवर अन्याय होऊ नये. प्रशासनाच्या चुकीची शिक्षा त्या व्यक्तीला भोगावी लागु नये. म्हणुन फक्त आपण हा निर्णय घेत आहोत. याच्यावर दुसर काही मार्ग असेल तर आपण सुचवा. या व्यक्तीवर अन्याय होता कामा नये.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, माझ अस म्हणण होत की, नितीन भाऊंनी जस म्हटल की, आपण ८ दिवसात एक मिटींग जर काढली आणि त्याच्यात सविस्तर जर घेतल. तर उद्या आपल्याला कोणालाही अडचण येणार नाही याबाबतीत. आम्हाला येथे विरोध नोंदवायचा नाही. त्यांनी केलेल काम खरच योग्य आहे. जर आपल्या त्यांना देणार नाही मोबदला तर ते चुकीच होईल. परंतु या कोरोनाच्या चुकीमुळे काही राहिल असेल. प्रशासनाची ही जर काही चुक झाली असेल तर त्यांनी ते लेखी जर ठेवल आणि मग नंतर निर्णय घेतला तर कमीतकमी आपल्या स्टँडींग कमेटीवर त्याचा आक्षेप येणार नाही.

**मा.सभापती :-** बोला चेतन भाऊ बोला.

**श्री.चेतन सनकत :-** ताई आपण आता जे मंजुरी देत आहोत त्याला ३० तारखेपर्यंत मुदत आहे. जर ३० तारखेपर्यंत हा ठराव नाही झाला काही कारणाने, तर भविष्यात आपल्याला हा ठराव करायला त्रास होईल. म्हणुन या तारखेच्या मुदतीच्या आत या ठरावाला आपण मान्यता द्यावी असे माझे मत आहे. ३० तारखेच्या आत या ठरावाला मान्यता द्यावी.

**मा.सभापती :-** आपण आयुक्त साहेबांकडुन याच्या संदर्भात काही खुलासे घेऊ या त्यानंतरच आपण निर्णय घेऊ या.

**मा.आयुक्त :-** मा.सभापती महोदया, आपण स्वत: आणि काही सन्मा.सदस्यांनी जी भुमिका मांडली त्याच्याशी मी आयुक्त म्हणुन किंवा प्रशासनाचा प्रमुख म्हणुन दोन्ही दृष्टीने मी सहमत आहे. प्रशासनाच्या कुठल्याही चुकीच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता देऊ नये. या मताचा मी व्यक्तीश: सुध्दा आहे. आणि म्हणुनच आमचे आताचे उपायुक्त, आरोग्य, आणि अंतर्गत लेखा परिक्षक या दोघांशी चर्चा करुनच प्रशासनाची भुमिका उपायुक्त, आरोग्य विभाग यांनी मांडलेली होती. जर सन्मा.सभागृहाच अस मत असेल की, हा प्रस्ताव चुकीचा आहे तर त्या चुकीच्या प्रस्तावाच समर्थन करण हे सुध्दा आपल्याला प्रशासकीय दृष्ट्या योग्य वाटणार नाही. आणि जस मा.सभापती महोदया म्हटल्या की, स्थायी समितीला वारंवार गृहीत धरण्याची प्रशासनाची एक पध्दत दिसुन येते. तर हे सुध्दा आपल्या महानगरपालिकेच्या हेल्थी प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नाही. अस जर होत असेल तर संबंधीतांना तसा मॅसेज ही गेला पाहिजे. ती स्थायी समिती सभा असेल, महासभा असेल किंवा कुठलेही सन्मा.पदाधिकारी असतील. त्यांची मान्यता मिळेल हे गृहीत धरणे बरोबर नाही. त्या त्या वेळेला त्यांचे जे मान्यता असतात. त्या मान्यता त्या त्या वेळेला घेतल्या पाहिजे. आपल्याला जर ही मुदत १७ मार्चला संपणार होती. तर मा.सभापती महोदया म्हटल्या त्याप्रमाणे जानेवारी फेब्रुवारी मध्ये हा प्रस्ताव आरोग्य विभागामार्फत जर आवश्यकता होती तर पुढे येणे आवश्यक होत. तो का आला नाही. जसे आपण म्हणत आहे त्याची काही कारणे असु शकतील. परंतु जर याच्यामध्ये आपण फाईल बघितली. तर तो वेळेवर प्रस्ताव पुढे गेला नाही आणि अर्थात त्याच्या मध्ये काही आयुक्तांच्या स्तरावरती असतील, काही लेखा परिक्षकांच्या स्तरावर असतील, काही लेखापालांच्या स्तरावर असतील. अर्थातच अश्या वेळेला काही मुद्दे उपस्थित होतात त्यांचे खुलासे येतात. मधल्या पिरीयेड मध्ये मी जी फाईल पाहिली आहे. त्याच्या मध्ये अस दिसत आहे की, मधल्या पिरीयेड मध्ये जेव्हा दंडवते होते आपल्याकडे उपायुक्त त्या पिरियेड मध्ये ही फाईल सुरु झाली होती. परंतु पुन्हा कोरोनाचा असेल, मध्ये तीन एक आठवडे दंडवते स्वत: आजारी पडले, नंतर त्यांची बदली झाली, या सगळयांमध्ये ज्या गतीने ही फाईल मा.स्थायी समिती समोर येणे अपेक्षित होत. ती आली नाही. परंतु जरी आलेली नसली तरी स्थायी समिती सदस्य किंवा मा.सभापती, स्थायी समिती यांनी अतिशय रास्त भुमिका मांडलेली आहे की, संबंधीत काम करणाऱ्या आपल्या कर्मचाऱ्यावर अन्याय होऊ नये. आपल्याला या प्रस्तावाच्या बाबतीमध्ये जस यापुर्वी सुध्दा आपल्याला या पदासाठी राज्य शासनाकडुन अनुदान मिळालेल आहे. आणि त्या अनुदाना अंतर्गतच आपण त्यांना वेळोवेळी मुदती दिलेल्या आहेत. परंतु आता मधल्या पिरियेड मध्ये ज्या वेळेला मागच हे स्वच्छता अभियानाच सर्वेक्षण संपल, आणि त्याच्यानंतर पुढच सुरु व्हायला आता वेळ आहे. मधल्या पिरियेड मध्ये आपल्याला दैनंदिन माहिती असेल किंवा कोरोना विषय कामकाज असेल, या कर्मचाऱ्याची आपल्याला गरज होती म्हणुन त्यांना त्या वेळेला जसे लेखा परिक्षकांनी म्हटल आहे. त्यांना आदेश दिलेले नव्हते. जो पर्यंत स्थायी समिती मंजुरी देत नाही तो पर्यंत आपल्याला आदेश देण हे प्रशासकीय दृष्ट्या योग्य नाही. मात्र त्यांची कामाची गरज विचारात घेऊन काम चालु राहिलेल आहे. अश्या प्रकारे जर स्थायी समितीला योग्य वाटल तर आपण कार्योत्तर मान्यता सुध्दा देऊ शकतो. त्याच्या बद्दलही काही नाही. हा प्रस्ताव चुकीचा आहे अस न म्हणता येणार नाही याच्या मध्ये विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. आता हे विलंबाचे कारणे जस विष्णु भाऊ म्हटले तसे आपल्याला समजुन घेता येतील. परंतु जर याच्यामध्ये आपल्याला मुदतवाढ देणे प्रशासकीय दृष्ट्या योग्य वाटत नसेल, तर आपण याच्या बद्दलचा प्रस्ताव शासनाला आपण पाठवु शकतो. आणि शासनाकडुन ही आपण याच्यासाठी वेगळया अनुदानाची मागणी करुन शासनाकडुन याची मान्यता मिळण्याचा आपण प्रयत्न करु शकतो की, जेणे करुन प्रशासनाच्या चुकीच्या प्रस्तावाला मा.स्थायी समितीने मान्यता दिली अस ही कोणाला वाटायला नको. आणि एक चांगला मॅसेज प्रशासनाला मा.स्थायी समितीकडुन जाईल की, आपण सगळे प्रस्ताव वेळेवरती घेतले पाहिजे. तर मला वाटत याचा विचार करुन बहुतांश सदस्यांनी म्हटल आहे की, प्रशासनाचा हा प्रस्ताव चुकीचा आहे. तो प्रस्ताव जरी समजा आपण परत पाठविला तरी शासनाच्या मान्यतेला आपण प्रस्ताव पाठविणेचा आपण विचार करु शकतो. माझी ही विनंती आहे की, एक हेल्थी प्रशासन आपल्याला महानगरपालिकेमध्ये निर्माण करायच आहे. जरी प्रशासनाची कुठल्याही त्रुटी असतील, मी म्हणत नाही की, त्या अधिकाऱ्याने जाणुनबुजुन केल्या असतील. अनावधानामुळे राहिल्या असतील, कामाच्या लोडमुळे राहिल्या असतील. पण तरी कुठल्याही कारणान अश्या प्रकारचे स्टॅट्री ईररेग्युल्यारीटी होऊ नये. या दृष्टीने मा.स्थायी समितीने घेतलेली भुमिका ही खरोखर कौतुकास्पद आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सदरचा प्रस्ताव हा नियमात बसत असेल तर प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही. परंतु या पुढे अस होता कामा नये. अश्या चुका वारंवार होता कामा नये. अशी प्रशासनाने काळजी घ्यायला हवी. प्रस्ताव मंजुर.

**मा.सभापती :-** प्रशासनाला या सक्त सुचना देण्यात येत आहे.येथुन पुढे असे कोणतेही अनियमित्ता असणारे प्रस्ताव स्थायी समिती असु द्या किंवा महासभा स्विकारले जाणार नाही. त्यांना मंजुरी मिळणार नाही. प्रशासनाने सदस्यांना गृहीत धरु नये. मात्र या पदावर काम केलेल्या व्यक्तीवर अन्याय होऊ नये. या भावनेतुन फक्त लोकप्रतिनिधी म्हणुन आमची जबाबदारी लक्षात घेऊन या प्रस्तावाला मान्यता देण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** नितीन भाऊ, आदरणीय नितीन भाऊ प्रस्ताव मंजुर आहे का हा ?

**मा.सभापती :-** माईक ऑन करा नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** ताई, प्रस्ताव मंजुर करणे किंवा नामंजुर करणे याच्या बद्दल वाद नव्हता. आपण जी भुमिका मांडली ती अत्यंत रास्त भुमिका होती आणि त्याच्यावरती आयुक्तांनी सुध्दा अत्यंत समर्पक असा खुलासा केलेला आहे. हा प्रस्ताव नामंजुर करणे हा फक्त एक सांकेतीक विषय होता. आपल्याला यात कोणाच नुकसान व्हाव, कोणासाठी वाईट हेतु असे अश्या संदर्भातला वाद नव्हता. वाद मुळात फक्त ऐवढाच आहे. अश्या पध्दतीने प्रशासनाला जो स्वत: आयुक्त महोदय यांनी या गोष्टी मान्य केल्या की, अश्या पध्दतीचा पायंडा पडता कामा नये. या दृष्टीकोणाने त्याच्या वरती विचार व्हायला पाहिजे. मान्य केल म्हणजे काय झाल. आपली चर्चा जी झाली. ती निष्फळ म्हणुन धरली जाईल.

**मा.सभापती :-** मला वाटत नितीन भाऊ तहकुब ठेवुन पुढच्या मिटींगमध्ये प्रशासनाने आता जे उत्तर दिलेले आहे. तेच आपल्याला साधारणपणे अपेक्षित होते. तर आता ईतिवृत्तात या सगळया खुलाश्याची नोंद होणारच आहे. आणि आपली भुमिका सुध्दा मला समजत आहे की, प्रशासनाने ही जी चुक केलेली आहे. त्याला लगेच आपण याच मिटींग मध्ये मान्यता देणे म्हणजे. आपल्या ऑब्जेक्शनचा टेम्पो घालविणे आहे. अस म्हटल तर हरकत नाही.

**श्री.नितीन लढढा :-** बिल्कुल बरोबर आहे.

**मा.सभापती :-** या व्यक्तीच नुकसान करायचे नाही म्हणुन आपण हा निर्णय घेत आहोत.

**श्री.नितीन लढढा :-** नाही. व्यक्तीच नुकसान होणार नाही मॅडम.

**मा.सभापती :-** येथे जो खुलासा दिला आहे त्याची ईतिवृत्तात नोंद निश्चितच होणार आहे. तश्या अर्थाच आपण ठरावामध्ये सुध्दा नोंद करुन घेऊ या आणि त्यानंतर त्याला मान्यता देऊ या.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया, आयुक्त साहेबांनी अत्यंत स्पष्ट शब्दात म्हणजे त्यांना प्रशासनाच्या कारभारा विषयी त्यांना स्वत:ला सुध्दा जे अपेक्षित होत त्या पध्दतीने अपेक्षित प्रतिसाद वरीष्ट असेलेले आयुक्त यांना सुध्दा मिळत नाही. याचा अर्थ अत्यंत साफ होत. आयुक्त साहेबांनी त्यांच्या मनातली व्यथा जी आपल्या मनात ही होती. तीची ती व्यथा आयुक्त साहेबांनी मांडलेली आहे. म्हणजेच काय आयुक्त महोदय यांनी दुसरी एक बात सांगितली की, सदरहु प्रस्ताव आपण राज्य शासनाकडे पाठवुन त्याच्या संदर्भातला अनुदान मागण्याच्या संदर्भातला ही विचार करता येईल. म्हणजे याचा अर्थ काय ? ही जी रक्कम आज महानगरपालिकेच्या खजिन्यातुन जात असेल आणि राज्य शासन या संदर्भात अनुदान देत असेल. तर राज्य शासनाकडुन ते अनुदान मागण्यात गैर नाही.शेवटी राज्य शासनाने काही कारणाने अनुदान नाकारल, तर संबंधीत अधिकारीच वेतन आपण रोखणार नाही. पण त्याच्यातुन जर राज्य शासनाकडुन अनुदान मिळत असेल. तर तो महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल.

**मा.सभापती :-** निश्चितच नितीन भाऊ जस आयुक्त सरांनी म्हटलेल आहे की, हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवु या.पण या सगळया प्रोसेस मध्ये या पदावर काम करणारे व्यक्तीच जे मॉरल डाऊन होणार आहे. मागील सहा महिनेपासुन ही व्यक्ती कार्यादेश नसतांना प्रामाणिकपणे काम करीत आहे. आणि माझ्या माहिती प्रमाणे अजुन पुन्हा पुढच्या काही शासकीय योजना आहेत. त्या कामी त्या व्यक्तीच काम महत्वाच आहे. आणि आपण हा असा प्रस्ताव केल्यानंतर, असा ठराव केल्यानंतर त्या व्यक्तीच मॉरल डाऊन होऊन त्यांनी जर ते काम करणे बंद केल किंवा त्या कामाकडे दुर्लक्ष झाल. तर त्याच विपरीत परिणाम आपल्या पुढच्या सगळया शासकीय स्वच्छते संदर्भात आपल्या जे काही पुढच्या योजना आहे. त्या निधीवर होणार आहे. या दृष्टीने आपण प्रशासनाचा आताचा खुलासा घेऊन प्रस्ताव पुढे नेत आहोत.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती ताई, आपल्याला काही अडचण नाही. फक्त एकच म्हणत आहे की, अश्या पध्दतीने आज आपण अधिकाऱ्याचा मॉरल डाऊन होण्याची भुमिका स्विकारतो. आणि ते स्विकारणे काही गैर नाही. योग्य आहे. आणि या सर्व सदस्यांच रोज आणि दर स्टँडींगला असो किंवा महासभेला असो. जे ओरडुन ओरडुन मॉरल संपत आहे. त्याच्या संदर्भातला आज कोणी विचार करायला पाहिजे. या बाबतीत सदस्यांच खच्चीकरण होत, या बाबत प्रशासन गंभिर आहे का ?

**मा.सभापती :-** निश्चितच, मला वाटत आता तरी प्रशासनाने या सर्व गोष्टींकडे लक्ष दिल पाहिजे की, वारंवार सदस्य, महापौर, सभापती सगळेच पदाधिकारी वारंवार प्रशासनाच्या कामाबद्दल ताशेरे ओढत आहे. आणि त्यानंतर ही आजची आमची जी लोकप्रतिनिधी म्हणुन सहकार्याची भुमिका आहे याच तरी प्रशासनाने मान ठेवावा आणि येथुन पुढे अश्या प्रकारच्या अनियमितता प्रशासनाकडुन येणार नाही. याची आपण आशा करु या नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** ताई आपण फक्त एक खुलासा प्रशासनाकडुन करावा. १२ महिन्यापुर्वी जे.सी.बी.च्या टायरच्या संदर्भातली चर्चा आपण मागच्या २५ दिवसापुर्वीच्या स्थायी समिती समोर केली आणि अद्यापपावेतो त्याला टायर मिळालेले नाही. आता हे जे.सी.बी.ला टायर उपलब्ध करुन देणे ही काय पदाधिकाऱ्याच्या खाजगी वाहनाला टायर उपलब्ध करुन देण्याची बाब नाही. सार्वजनिक हिताचे कामी येणारे मशिनरीच्या संदर्भातली मागणी आहे.

**मा.सभापती :-** नितीन भाऊ, आपल्या या विषयावर पहिले अजंड्यावरचे विषय संपल्यानंतर निश्चितच या विषयावर चर्चा करु या.

**श्री.नितीन लढढा :-** काही अडचण नाही.

**मा.सभापती :-** पोकळे साहेब बोला, बोला आपला माईक ऑन करा, पोकळे साहेब आपल्याला या विषयावर बोलायचे आहे का ?

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला या विषयावरच बालायचे आहे. आता आपली या विषयावर चर्चा झालेली आहे. त्याच्या मध्ये प्रशासनाने स्पष्ट सांगितल आहे की, सदरचा प्रस्ताव तुम्ही अमान्य करा. आता आपण याला मान्य करण्याच्या संदर्भात चर्चा करत आहोत. मला फक्त इतक विचारायचे आहे की, या सर्व विषयात संपुर्ण आर्थिक जबाबदारी कोणाची राहील. उद्या लेखापरिक्षणामध्ये जर आर्थिक बाजुवर भर दिला गेला, आर्थिक नुकसान होत असेल तर याची आर्थिक जबाबदारी कोणाची राहिल.

**मा.सभापती :-** सदस्यांच प्रश्न असा आहे की, या संदर्भातली आर्थिक जबाबदारी उद्या जर ऑडिट ॲब्जेक्शन जर या अनियमिततेमुळे निघाल. तर जबाबदारी कोणाची राहिल. सदस्यांवर याची काही आर्थिक जबाबदारी येईल का याच प्रशासनाने खुलासा करावा.

**श्री.संतोष वाहुळे,मु.ले.अ. :-** या बाबीमध्ये मी माझा अभिप्राय अतिशय स्पष्ट नोंदविलेल होते की, आपल्याकडे जे सार्वजनिक स्वच्छता रोजंदारी किंवा मानधन याच्या उपलब्ध जी तरतुद १२ लक्ष रुपयांची आहे. त्याच्या अंतर्गत हा खर्च करता येऊ शकेल आणि तात्कालीक परिस्थिती विचारात घेता प्रशासनाने ही नियुक्ती केलेली होती आणि नियुक्ती केलेनुसार आता याच्या मध्ये प्रोसिजर लॅप्स आहे थोडासा. परंतु त्यांनी काम केलेल आहे त्यामुळे या खर्चाची जबाबदारी स्थायी समिती किंवा कोणावर येणार नाही अस माझ वयक्तीक मत आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** साहेब व्ययक्तीक मत तुम्ही मांडत आहे तेथे, आम्हाला प्रशासनाचा अधिकारी म्हणुन मत पाहिजे.

**श्री.विष्णु भंगाळे:-** सभापती महोदया,

**मा.सभापती :-** बोला, बोला.

**श्री.विष्णु भंगाळे:-** जर अशी दुईधा स्थिती असेल तर आमचे शिवसेनेच्या तीन सदस्यांच या विषयाला तटस्थची भुमिका ठेवा.

**मा.सभापती :-** बरं.प्रशासनाने याची आर्थिक जबाबदारी सदस्यांवर येईल का या पोकळे साहेबांच्या प्रश्नाला स्पेसिफीक उत्तर द्याव.

**मा.आयुक्त :-** सन्मा.सभापती महोदया, आर्थिक अनियमितता असेल, महानगरपालिकेच नुकसान होत असेल, नियमबाह्य खर्च असेल तरच त्याची जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्न येतो. ही जबाबदारी सन्मा.सदस्यांची आहे का प्रशासनाची आहे की, अन्य कोणाची आहे. हा जबाबदारी निश्चितीचा प्रशासकीय कार्यपध्दतीचा भाग आहे.याच्या मध्ये आपल्याला प्रथमत: काही अनियमितता करत आहात का ? किंवा अनावश्यक खर्चाला मान्यता देत आहोत का ? किंवा नियमबाह्य खर्चाला मान्यत देत आहोत का ? हा मुद्दा आहे. आता याच्यामध्ये जस आपल्या लेखापरिक्षकांनी मुद्दा क्लीयर केला की, आपल्याला या कर्मचाऱ्याच्या कामाची गरज आहे. त्यानी काम केलेल आहे किंवा पुढे ही तो करत राहील.आपल्याकडे याच्यासाठी जे काही लेखाशिर्ष आता लेखापरिक्षकांनी सांगितल, त्याच्यामध्ये आपल्याकडे तरतुद आहे.अश्या प्रकारे ६ महिन्यापेक्षा जास्त काळ एखाद्या तात्पुरत्या कर्मचाऱ्याला नियुक्ती द्यायची असेल. तर सहा महिन्यापर्यंतची नियुक्त आयुक्त आपले अधिकाराने देऊ शकतात. सहा महिन्यापेक्षा जास्त काळाची जर नियुक्ती द्याची असेल. तर मा.स्थायी समितीला आपल्या कायद्याप्रमाणे अधिकार आहे. त्यामुळे एखाद्या तात्पुरत्या सेवेची आपल्याला गरज असेल. त्याला जर सहा महिन्यापेक्षा जास्त स्थायी समितीने मान्यता दिलेली असेल. त्याच्या मानधनाची किंवा

रोजंदारी वेतनाची तरतुद महासभेने मंजुर केलेल्या लेखाशिर्षांतर्गत जर असेल. आणि हे जे पद आहे. हे पद आपल्याला स्वच्छ भारत मिशन अंतर्गत राज्य शासनाने आपल्याला दिलेल आहे. मग काही काळासाठी राज्य शासन अनुदान देतो. उर्वरीत कालावधीसाठी अर्थातच महानगरपालिकेला स्वत:च्या निधितुन खर्च कराव लागत. त्यामुळे या सर्व बाबी बघितल्या तर या खर्चामध्ये नियमबाह्यता, अनियमितता किंवा बेकायदेशीरपणा नाही. त्यामुळे त्याची जबाबदारी कोणावर येण्याच काही कारण नाही हे उपायुक्त यांनी स्पष्ट केलेल आहे. त्याच्यामुळ आपण जर या खर्चाच्या बाबतीत समाधानी असु. ज्या बद्दल आपण खर्च करत आहोत त्या बद्दल जर स्थायी समिती कन्व्हीन्स होत असेल.तर अर्थातच याच्यामध्ये जबाबदारी निश्चितीचा प्रश्नच येणार नाही. असे मला वाटत.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सर आपण सहा महिन्यांचा उल्लेख केलेला आहे. सहा महिन्याचे आपल्याला अधिकार आहेत.मला अस वाटत यांनी यापुर्वी ही सहा महिने काम केलेले आहे.

**मा.सभापती :-** यापुर्वी तीन महिने काम केलेल आहे त्यांनी.

**मा.आयुक्त :-** म्हणुनच आपण त्याच्यामध्ये यांचा कालावधी सहा महिन्यांपेक्षा जास्त होतो. म्हणुन त्याला आपल्याला मा.स्थायी समितीच्या मान्यतेची आवश्यकता आहे. आणि म्हणुन हा प्रस्ताव आलेला आहे. आता बघितले थोडे मी याच्यामध्ये फाईल. तर साधारणता आरोग्य खात्यामध्ये त्यावेळेला दंडवते साहेब असतांना मी मे एन्डला फाईल आणलेली आहे. त्याच्यानंतर काही लेखा परिक्षकांचे आक्षेप होते. त्यांचे आक्षेपांची पुर्तता केलेली आहे. माझ्या कडे आल्यानंतर त्याचा कालावधी किती झालेला आहे. अनुदान किती मिळालेल आहे. शासनाच्या अनुदानातुन आपल्याला त्यांच मानधन देता येईल का ? या सगळया मुद्दयांची तपासणी केल्यानंतर हा प्रस्ताव आरोग्य खात्याकडुन फाईनली आलेला आहे. हा प्रस्ताव जर जानेवारी फेब्रुवारीमध्येच मुव्ह केला गेला असता आरोग्य खात्याकडुन कदाचित आपल्याला मार्च किंवा एप्रिलच्या बैठकीमध्ये मा.स्थायी समितीची मान्यता घेणे शक्य झाल असत. त्यामुळे आज जी आपल्या त्याची मान्यता संपण्याच्या महिन्यामध्ये स्थायी समिती समोर हा विषय आला आहे. हे आपल्याला विलंब त्याच्यामुळे टाळता आला असता. प्रशासकीय विलंब  आणि खर्चामधील अनियमितता माझी सदस्यांना विनंती आहे की, या दोन गोष्टी मधला फरक आपल्याला करता यायला हवा. याच्या मध्ये विलंब झालेला आहे पण खर्चामध्ये किंवा आपण जी मान्यता देत आहोत. त्याच्या मध्ये अनियमितता किंवा नियमबाह्यपणा कुठेच दिसुन येत नाही.

**मा.सभापती :-** आयुक्त साहेबांनी या विषयाच्या संदर्भात जो खुलासा केलेला आहे. तो सभापती म्हणुन मला मान्य आहे की, हा विषय वेगळा आहे की, प्रशासनाने या कामामध्ये केलेली दिरंगाई, या कामाची निकड हा काम झालेल असणे, या संदर्भातल निधी उपलब्ध असणे,किंवा मनपा फंडातुन कराव लागणे, दोन वेगवेगळया गोष्टी असल्यामुळे प्रशासनाच्या या मताशी मी सहमत आहे. म्हणुनच मला वाटत नियुक्तीस आणि खर्चास बहुमताने मान्यता देणेस हरकत नाही. चेतन दादा तुम्हाला काही बोलायच आहे या विषयावर. बोला.

**श्री.चेतन सनकत :-** ताई, मी तेच सांगत आहे. कायद्याच्या चौकटीत राहुन आपण याला मान्यता द्यायला हरकत नाही.

**मा.सभापती :-** निश्चितच, या विषयाला आपण मान्यता देऊ या. शिवसेनाचे सदस्यांची तटस्थची भुमिका असेल हरकत नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य.

**मा.सभापती :-** प्रशासनाने  फक्त याची दक्षता घ्यायची आहे. प्रशासनाला ही सुचना असणार आहे की, या कामामध्ये नंतर भविष्यात जर काही ऑडिट  ॲब्जेक्शन निघाल. तर याची संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची असणार आहे. बहुमताने ठराव मंजुर.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अस होऊच शकत नाही सभापती महोदया, जर स्थायी समिती सदस्य मंजुर करीत आहे. तर त्याची जबाबदारी त्यांची राहील.

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ आपण त्याच्यामध्ये नोंद करीत आहोत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-** विषय क्र.५ जे आहे. आदरणीय विष्णु भाऊ, आदरणीय नितीन भाऊ शिवसेनेची भुमिका तटस्थ आहे. बरोबर आहे ना.

**श्री.विष्णु भंगाळे :-** बरोबर आहे.

**नगरसचिव :-** तर बहुमताने हा ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र नागरी विकास अभियान, संचालनालय स्मार्ट सिटी अभियान, अमृत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडील कार्य्रकारी संचालक यांचे कडील पत्र क्रं.राअस/ एसएमएम/सिको/नियुक्ती*२३२२/२०१७-१८ दि.०७/१०/२०१७ अन्वये श्री.महेंद्र दत्तात्रय पवार राहणार जळगांव यांची स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१८ करीता कंत्राटी तत्वावर सिटी कॉर्डीनेटर म्हणून नाशिक विभागातील जळगांव शहर महानगरपालिका करीता कंत्राटी तत्वावर अटी शर्तीस बंधनकारक राहून रुजू दिनांकापासून ते दि.२८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत रु.३०,०००/- मासिक परिश्रमिक भत्ता म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी विकास अभियान, संचालनालय स्मार्ट सिटी अभियान, अमृत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडील कार्यकारी संचालक यांचे कडील पत्र क्रं.राअस/संकिर्ण/८९/२०१७-१८ दि.२२/०१/२०१८ व पत्र क्रं.राअस/सी.सी./११३९/२०१८ दि.०६/११/२०१८ अन्वये श्री.महेंद्र दत्तात्रय पवार यांना सिटी कॉर्डीनेटर म्हणून वेळोवेळी ६ महिन्याचा कालावधी वाढवून नियुक्तीचे आदेश देण्यात आलेले होते.

स्वच्छ सर्वेक्षण-२०२० करिता स्वच्छ भारत अभियान अंतर्गत व स्वच्छ महाराष्ट्र अंतर्गत खालील प्रमाणे योजना जळगांव शहर महानगरपालिकेत राबविणे शासनाचे निर्देश आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत

१. जळगांव शहर हागणदारीमुक्त ओ.डी.एफ, ओ.डी.एफ, + ओ.डी.एफ ++ करणे.
२. कचरा मुक्त शहर नामांकन मिळविणे (३ स्टार नामांकन, ५ स्टार नामांकन, ७ स्टार नामांकन)
३. स्वच्छ सर्व्हेक्षण-२०२० अंतर्गत आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता करुन त्यामध्ये शहर राष्ट्रीयस्तरावर चांगले गुणांकन मिळविणे व शासनाकडून मंजूर घनकचरा प्रकल्पाच्या अनुषंगाने आवश्यक तांत्रिक बाबींची पुर्तता करणे व घनकचरा प्रकल्पाबाबत अंमलबजावणी करणे कामी स्थानिक दैनिक लोकमत या वृत्तपत्रात दि.०८/११/२०१९ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तसेच दि.१६/११/२०१९ रोजी आलेल्या उमेदवारांची आयुक्त व नोडल ऑफिसर तथा उपायुक्त यांनी मुलाखत घेवून त्यामधून श्री.पवन पंढरीनाथ चौधरी यांची दि.१८/११/२०१९ रोजीच्या दिनांकापासून ४ महिन्यांकरिता आयुक्त यांचे मान्यतेने सिटी कॉर्डीनेटर म्हणून नियुक्तीचे आदेश निर्गमीत करण्यात आलेले होते.

तसेच श्री.पवन पंढरीनाथ चौधरी, सिटी कॉर्डीनेटर यांचे दि.१७/०३/२०२० रोजी सदरचे आदेश संपुष्टात आल्याने सध्यस्थितीत स्वच्छ सर्व्हेक्षण-२०२१ च्या स्पर्धेकरिता आवश्यक असलेल्या प्रत्येक तीमहाची माहिती (MIS) शासनसंकेतस्थळावर अपलोड करणे, घनकचरा व्यवस्थापन त्याचेशी निगडीत असलेल्या प्रकल्पाची माहिती शासनास वेळोवेळी देणे, महाराष्ट्र नियंत्रण प्रदुषण मंडळाला ऑनलाईन दैनंदिन अहवाल सादर करणे, मा.विभागीय आयुक्त कार्यालयाशी स्वच्छ सर्वेक्षण व डि.पी.आर.च्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी पत्र व्यवहार करणे, कचरा मुक्त शहर नामांकन मिळविणे (३ स्टार नामांकन, ५ स्टार नामांकन, ७ स्टार नामांकन) सहभाग नोंद करणे, जळगांव शहर हागणदारीमुक्त ओ.डी.एफ, ओ.डी.एफ, + ओ.डी.एफ ++ करणे या सर्व बाबींसाठी सिटी कॉर्डीनेटर यांची नेमणूक करणे अत्यंत आवश्यक आहे.

तसेच श्री.पवन पंढरीनाथ चौधरी यांनी प्रथम नियुक्ती नुसार केलेल्या कालावधी मध्ये म.न.पा. कचरा मुक्त शहर करिता ३ स्टार प्राप्त करुन दिलेले असून व स्वच्छ सर्वेक्षण-२०२० मध्ये उत्कृष्ट कामाचा दर्जा दिलेला असल्याने श्री.चौधरी यांचे आदेश संपुष्टात आल्यानंतरही उपायुक्त, सहा.आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेले निर्देशानुसार श्री.पवन चौधरी हे (MIS) शासनसंकेतस्थळावर अपलोड करणे,

घनकचरा व्यवस्थापन त्याचेशी निगडीत असलेल्या प्रकल्पाची माहिती शासनास वेळोवेळी देणे, महाराष्ट्र नियंत्रण प्रदुषण मंडळाला ऑनलाईन दैनंदिन अहवाल सादर करणे, मा.विभागीय आयुक्त कार्लालयाशी स्वच्छ सर्वेक्षण व डि.पी.आर.च्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी पत्र व्यवहार करणे इ.कामे करत आहे.

त्यामुळे श्री.पवन पंढरीनाथ चौधरी यांना दिलेल्या आदेशाच्या कालावधी संपल्यानंतर दि.०१/०४/२०२० ते दि.३०/०९/२०२० याकलावधीसाठी पुन्हा नियुक्तीसाठी ६ महिन्याकरिता आदेश देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच सदर कामी होणारा खर्च आरोग्य / सार्व.स्वच्छता या रोजंदारी आस्थापना / मानधन (उपलब्ध तरतूद १२ लक्ष) या लेखा शिर्षाव्दारे करणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र याबाबत स्थायी समितीने पूढील प्रमाणे आक्षेप नोंदविलेले असून, यामध्ये प्रस्ताव विलंबाने सादर करणे तसेच प्रस्ताव सादर करण्यामध्ये झालेल्या अनियमितता इत्यादी बाबत भविष्यात शासकीय लेखा परिक्षणात काही आक्षेप आल्यास अथवा काही कायदेशिर बाबी उपस्थित झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०  प्रतिकुल मते :- ००  तटस्थ :- ०३**

**सुचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्र. ६:-** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.संकीर्ण-११९८/प्र.क्र.३०/ नवि ०४ दि.११ जुन २०२० अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर निधीच्या विनियोगा संबंधी सदरचा प्रस्ताव स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

**श्री.चेतन सनकत :-** माहिती घेतली.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.संकीर्ण-११९८/प्र.क्र.३०/ नवि ०४ दि.११ जुन २०२० अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर निधीच्या विनियोगा संबंधी सन२०१५-१६, सन २०१६-१७, सन २०१७-१८, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना नगर विकास विभागामार्फत वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने कामे पुर्ण करुन निधी खर्च करण्यास दि.३१ मार्च २०२१ पर्यंत मुदत वाढ देण्यांत आलेली आहे.

तसेच सन २०१४-१५ व त्यापुर्वीच्या वर्षात नगरविकास विभागामार्फत वितरीत करण्यांत आलेल्या व अदयाप अखर्चित असलेला निधी तात्काळ शासनास जमा करण्यांत यावा याबाबत निर्देश देण्यांत आलेले आहे. तरी शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णयाची माहिती स्थायी समितीने घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३  प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :-दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ७:-** डॉ.श्री.विजय पंडीत घोलप, वैदयकीय अधिकारी यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी बंद केल्याच्या व रुपये १०० चे मुंद्राक शुल्क पेपरवर माफीनाम्याच्या प्रकरणाबाबत स्थायी समिती ठराव क्रं.१९७ दि.१३/१२/२०१९ अन्वये तहकुब करण्यात आलेल्या विषयावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.
**श्री.सदाशिव ढेकळे :-** अनुमोदन आहे.
**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया,
**मा.सभापती :-** बोला विष्णु भाऊ.
**श्री.विष्णु भंगाळे :-** आमची तटस्थ भुमिका राहिल.
**मा.सभापती :-** ठिक आहे.
**श्री.विष्णु भंगाळे :-** नगरसचिव महोदय,
**मा.सभापती :-** बोला विष्णु भाऊ.
**श्री.विष्णु भंगाळे :-** नगरसचिव महोदयांना सांगु ईच्छितो की, ती नोंद घ्यावी आमची ती नोंद घ्यावी तटस्थची.
**श्री.चेतन सनकत :-** ताई, मी असे सांगु ईच्छितो की, डॉ.विजय घोलप हे आज कोरोना कार्यकाळात ज्या पध्दतीने सेवा बजवित आहे. आणि या परिस्थिती मध्ये आपले कर्मचारी असो किंवा डॉक्टर असो. नर्स असो जे या परिस्थितीमध्ये कोरोना योध्दा म्हणुन पुढे आलेले आहे. त्या अनुषंगाने या ठरावास मान्य करणेस काही हरकत नसावी. कारण की, त्यांची कामाची निकड आज आपण बघत आहोत. आपण सर्व अधिकारी पदाधिकारी त्या ठिकाणी पाहणीसाठी जात राहतो. त्यांची आजची कामाची पध्दत कशी आहे आपल्याला समजत आहे.
**मा.सभापती : -** निश्चितच, घ्या पुढचा विषय घ्या.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.
**नगरसचिव :-** विषय क्र.७ हा बहुमताने मंजुर आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सौ.उज्वला उज्वल पंधरे,परिचारिका,दवाखाने विभाग यांनी मा.शिस्तभंग विषयक प्राधिकारी,मनपा जळगांव यांचेकडेस " डॉ.घोलप सर माझ्या सोबत अपशब्दांनी बोलले व माझे अपरन ओढल्याबाबत " दि.८/०७/२०१६ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने महिला लैंगिक छळ प्रतिबंधक अंतर्गत समिती,जळगांव महानगरपालिका जळगांव यांनी सादर केलेल्या दिनांक १६/०९/२०१६ रोजीच्या चौकशी अहवालामध्ये डॉ.श्री.विजय पंडील घोलप दोषी असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच प्रमुख वैदयकीय अधिकारी यांचे मार्फत सादर केलेल्या अहवालामध्ये सुध्दा डॉ.श्री.विजय पंडीत घोलप दोषी असल्याचे नमुद आहे. याबाबत स्वत:डॉ.श्री.विजय घोलप यांनी केलेल्या खुलाश्यात त्यांनी त्यांची चुक मान्य करुन माफी मागीतलेली आहे. त्यामुळे तत्कालीन आयुक्त यांनी डॉ.श्री.विजय घोलप यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी बंद केलेल्या आहेत.

परंतू डॉ.श्री.विजय पंडीत घोलप यांचा दि.२०/०२/२०१९ चा प्राप्त अर्ज तसेच परिचारीका सौ.उज्वला उज्वल पंधरे यांचा दि.१७/१०/२०१८ व दि.२०/०२/२०१९ रोजीचे अर्ज प्राप्त झालेनुसार प्रशासनाने सदर प्रकरणी सखोल चौकशी केली व अवलोकन करुन प्रशासनाने अहवालानुसार डॉ.घोलप यांनी केलेले गैरवर्तन सहेतूक नसून कामाच्या ओघामध्ये झाल्याचे दिसून येते. सौ.उज्वला उज्वल पंधरे यांनी समक्ष व लेखी मांडलेले म्हणणे, डॉ.घोलप यांची विनंती या सर्व बाबींचा सर्वकष विचार करुन " डॉ.घोलप यांच्या २ वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी बंद करण्याच्या निर्णयामध्ये अंशत: बदल करुन दि.०१/०७/२०२० रोजी देय होणारी वेतनवाढ पूर्वीच्या वेतनवाढीसह गृहीत धरुन अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे मात्र मागील कालावधीची कोणतीही थकबाकी, आर्थिक लाभ डॉ.श्री.विजय घोलप यांना देय असणार नाही.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०** **प्रतिकुल मते :- ००** **तटस्थ :- ०३**

**सुचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ८:-** सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे लेख्यास (जमा व खर्च) मंजूरी देणेबाबत स्थायी समिती ठराव क्रं.२५६ दि.२५/०८/२०२० अन्वये तहकुब करण्यात आलेल्या विषयावर विचार करुन निर्णय घेणे.
**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** विषय मान्य आहे.
**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.
**नगरसचिव :-** सर्वानुमते आहे ना विष्णु भाऊ आदरणीय विष्णु भाऊ.
**श्री.विष्णु भंगाळे :-** हो सर्वानुमते आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, मुख्य लेखाधिकारी यांनी सादर केलेले जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखा विवरण पत्रातील मनपा निधी व शासकीय निधीच्या जमा व खर्चाची स्थायी समितीने माहिती घेतली त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा चे कलम ९४ (१) चे तरतुदी प्रमाणे सन २०१९-२० च्या वार्षिक हिशोबास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ९:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.
**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माहिती घेतली.
**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.
**नगरसचिव :-** आदरणीय विष्णु भाऊ सर्वानुमते मंजुर आहे का ?
**श्री.विष्णु भंगाळे :-** हो सर्वानुमते मंजुर आहे पण त्याच्यावर आमचे नितीन भाऊ बरडे बोलत आहे.
**श्री.नितीन बरडे :-** हॅलो हॅलो .
**मा.सभापती :-** बोला नितीन भाऊ.
**श्री.नितीन बरडे :-** सभापती महोदया,
**मा.सभापती :-** बोला नितीन भाऊ येत आहे आपला आवाज बोला.
**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब, मी गेल्या सभेत एक तक्रार केली होती. रस्त्यांबाबत त्याच्या चौकशीच काय झाल.
**मा.सभापती :-** मागच्या सभेत सदस्यांनी काही तक्रार केलेली होती रस्त्यांबाबतची. त्याबद्दलचा खुलासा प्रशासनाने करावा.
**श्री.डी.एस.खडके :-** हॅलो, येत आहे का भाऊ आवाज ? त्या सर्व प्रकरणाचा मी अभ्यास करीत आहे. सर्व जे.ई.द्वारे, मोजणी पुस्तक मागविलेले आहे.मी २५ तारखेपर्यंत त्याचा अहवाल देणार.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया,

**मा.सभापती :-** बोला बोला.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता आपण या सर्व संविदा मंजुर करीत आहोत. नक्कीच परंतु इतके संविदा मंजुर केल्यानंतर जळगांव शहरात खड्डयांच्या बाबतीत असेल किंवा रस्त्यांच्या बाबतीतला प्रश्न जसाचा तसाच राहत आहे. या बाबतीत काय कारण जर आपण ऐवढया मोठया प्रमाणावरती करोडो रुपये जर आपण या संविदाच्या माध्यमातुन खर्च करत आहे. रस्ते आणि रस्त्यात खड्डे जसेचे तसे राहण्याचे कारण काय ?

**श्री.डी.एस.खडके :-** भाऊ आपण येत्या महासभेला ९ कोटी २० लाख रुपयाचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. प्रभाग निहाय रस्त्यांचे खड्डे खडीने बुजविण्याबाबत येत्या महासभेमध्ये प्रस्ताव ठेवलेला आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** येणाऱ्या महासभेत आपण जे निर्णय घेऊ ते पुढील काळासाठी घेऊ.

**श्री.डी.एस.खडके :-** हो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** या संविदांसाठी जी माहिती आहे किंवा जे झालेले आहे. आता आपण नेहमी रोज वर्तमान पत्रात पहात असेल, लोकमत असेल दिव्य मराठी असेल, या पेपरांमध्ये रोजच आपण पाहत असेल तर या खड्डयांच्या बाबतीत नेहमी दाखविल जात आहे. आणि आपण फक्त एकच कारण देत आहोत की, अमृत योजना. माझ एक मत आहे की, ज्या भागांमध्ये अमृत योजनेच काम नाही त्या भागांमध्ये सुध्दा खड्डे आहे. आणि अमृत योजना जरी असली तरी तेथे ती यंत्रणा, रस्ते, ती नाली बुजुन काम करते की, नाही करते हे पाहण्याच काम आपल्या प्रशासनाच आहे. नागरीकांना वेठीस धरण्याच नाही. सभापती महोदया, मी आपल्या माध्यमातुन सांगु ईच्छितो की, नक्कीच या खड्डयांच्या वरती आपण तोडगा काढला पाहिजे की, येणाऱ्या काळामध्ये जळगांव शहरात खड्डे मुक्त कस होईल. या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजे.आता या संविदा आपल्या खुप आहेत.हे काम वेगवेगळया भागांमध्ये होत आहे. हे खरच होत आहे का किती क्वालिटीचे होत आहे. त्याच सुध्दा आपण निरिक्षण केल पाहिजे. आणि तेच म्हणण नितीन बरडेंच होत की, क्वालिटी आपण तपासत आहोत का ? तेच खड्डे पुन्हा दाबले जातात.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया, सभापती महोदया,

**मा.सभापती :-** बोला नितीन भाऊ,

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया, मला प्रशासनाकडुन थोडीशी एक माहिती जाणुन घ्यायची आहे. मागील दोन वर्षामध्ये प्रशासनाने खड्डे बुजविण्यावर किती खर्च केलेला आहे.

**मा.सभापती :-** मागील दोन वर्षामध्ये किती खर्च केलेला आहे खडके साहेब ?

**श्री.नितीन बरडे :-** खडके साहेब आज अभियंता दिवस आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आज अभियंता दिवस आहे खडके साहेब. मला वाटत तुमचे काही शेवटचे महिने बाकी आहे. अभियंता दिवसाला न्याय द्या खडके साहेब.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** १५ दिवस बाकी आहे भाऊ.

**मा.सभापती :-** शेवटचा महिनाच आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो शेवटचा महिना आहे. नंतर आमच्या ताब्यात आहे. रिटायर झाल्यावर.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** भाऊ, एकझ्याक्ट फिगर मला माहित नाही. पण ३ कोटीच्या जवळपास खर्च झालेला आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ३ कोटी रुपये मागील एक वर्षामध्ये की दोन वर्षामध्ये.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** ३ कोटी खर्च अपेक्षित आहे. कारण १ कोटी ६० लाखाची मागच्या महिन्यात ऑर्डर दिलेली होती. आणि त्याच्या मागच्या वर्षीपण तेवढच खर्च झाल असेल. म्हणुन ३ कोटी खर्च झालेल असेल.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया, १ कोटी ६० लक्ष रुपये खर्च म्हणजे ही काही थोडी थोडकी रक्कम नव्हे. परंतु आज मला सांगा जळगांव शहरातील कुठलाही रस्ता घ्या. कुठल्याही भागातला घ्या.अमृत योजनेच काम झाल असेल किंवा ज्या भागात अमृत योजना पोहचली नसेल. एकुण एक रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. १ कोटी ६० लाखा रुपये आणि दोन वर्षात साधारणता ३ कोटी रुपयेच्या जवळपासच खर्च झालेला आहे. आणि पुढील भविष्यातल्या येणाऱ्या महासभेमध्ये साधारणत: अजुन ९ कोटी रुपयांचे कामे करण्याच्या संदर्भातल्या प्रशासनाचा मनोदय आहे. मला सांगा हा पैसा निव्वळ पाण्यात जातो. याच योग्य कुठेतरी धोरण राबविल गेल पाहिजे. कामाची योग्य पध्दत असली पाहिजे. निव्वळ नावाला खड्डे बुजविले जातात.आणि पैसा जो आहे तो पुन्हा खड्डयातच जातो. या विषयावर प्रशासन आणि पदाधिकारी यांना खुप गांभिर्याने विचार करण्याची गरज आहे. शेवटी काय होत की, ज्या गोष्टींवर आपण पैसा खर्च करतो. कमीतकमी त्या पैश्यांच चिज तरी झाले पाहिजे. १०० टक्के नसेल तरी ८०-९० टक्के काम एक समाधानकारक रित्या. दोन चार पाच वर्षात काही तरी समाधान नागरीकांना मिळायला हव. परंतु तसे होतांना दिसत नाही. प्रत्येक वेळी खड्डे बुजविण्याच्या नावाखाली कामे निघतात. आणि

खड्डयांवर होणारा खर्च खड्डयातच जातो. याच्याबाबत गांभिर्याने विचार करण्याची कुठेतरी वेळ येऊन ठेपलेली आहे. कुठेतरी याच एक मोठ धोरण ठरवाव लागेल. आणि ते मोठ धोरण ठरवुन जेथे आवश्यक लागेल त्या रस्त्यांवरतीच डागडुगी करणे ते मी मागच्या सभेत ही बोललो होतो. आता परिस्थिती अशी आहे की, ८० टक्के रस्ते जे आहे. हे दुरुस्ती करणे लायक सुध्दा नाही. म्हणजे याच्यावरती पुनश्च: ८-९ कोटीचा होणारा खर्च मागील तीन वर्षात झालेला खर्च ३ कोटी रुपये. हा साधारणता १२-१३ कोटी रुपयांच आहे. याच कुठेतरी एक योग्य धोरण ठरवुन आवश्यकतेनुसार प्राथमिकतेनुसार योग्य पध्दतीने रस्ते तयार करणे आणि रस्ते सुध्दा तयार करत असतांना आपण म्हणजे मी असे म्हणत नाही की, याच काळात रस्ते खराब झाले असतील. आमच्या कालावधीत झालेल्या कामांच्या बाबतीत ही काही तक्रारी असतील. तस नाही. परंतु या तक्रारी कायमस्वरुपी निवारण करायचे असतील. तर रस्त्यांचे इस्टीमेट बनविताना रस्त्याचा खोलगट भाग रस्त्याचा उतार या सगळया गोष्टींच आपल्या कनिष्ठ अभियंत्यांनी या घेतल्या गेल्या पाहिजे. आपल्या येथे जो ईस्टीमेट तयार होतात ते फक्त कागदोपत्री तयार होतात. आणि प्रत्यक्षातली परिस्थिती तेथे वेगळी असते. मग जे अॅटम ज्या कामामध्ये घेतले गेले असतील त्या पध्दतीने काम केल तर ते काम फुलप्रुफ होत नाही. म्हणुन या संदर्भात कुठेतरी एखादी योग्य समितीची गठन करुन प्रत्येक रस्ता हा शास्त्रोक्त पध्दतीने तयार व्हायला पाहिजे. जेणे करुन त्याच्यावरती होणारा खर्च हा पाण्यात जाणार नाही. याच्या संदर्भातली भुमिका प्रशासनाने स्पष्ट करायला हवी.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** नक्कीच भाऊ, आपण जवळपास २००१-०२ मध्ये अटलान्टा मार्फत जळगांव शहरातले रस्ते आपण डांबरीकरण केलेले आहे. त्यानंतर २००१ पासुन २०२० पर्यंत बऱ्याच प्रमाणात आपण रस्त्यांचे कामे हाती घेऊ शकलेलो नाही. आणि आता अमृत, पाणी पुरवठा आणि अन्डरग्राऊंड ड्रेनेजच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने ज्या भागातील अन्डरग्राऊंड ड्रेनेज आणि पाणी पुरवठा योजना पुर्ण झालेली असेल त्याच भागातील रस्ते प्रस्तावीत करावे असा शासन निर्णय आहे. त्या अनुषंगाने आपण या दोन वर्षामध्ये बऱ्याच प्रमाणे रस्तेचे काम हाती घेऊ शकलो नाही. आणि दोन तीन वर्षात जे रस्तेचे कामे हाती घेऊ शकलो नाही त्या अनुषंगाने पुर्वीच्या रस्त्यांची परिस्थिती आणि या दोन वर्षाच्या कालावधी मध्ये रस्त्याचे कामे हाती नाही घेऊ शकल्यामुळे बरेच बहुतांशी रस्त्यांवरती मोठया प्रमाणात खड्डे पडलेले आहे. अश्या परिस्थिती मध्ये जरी आपण खड्डे दुरुस्तीच अंदाजपत्रक केलेल आहे. बहुतांश आपण खड्डयांच काम हाती घेतांना बरेच नागरीकांचे किंवा लोकांचे रस्त्यावर पॅचवर्क असतो तर ते पुर्ण १० मिटर १५ मिटरचा रस्ता आपल्याला कराव लागत. त्याप्रमाणे आपण आता ही काम हाती घेतलेल आहे. आणि भविष्यात ही खड्डे बुजविण्यात जशी रस्त्याची परिस्थिती असेल त्याप्रमाणे आपण पॅचवर्कच्या अनुषंगाने किंवा ज्या भागात खड्डे पडलेले असेल. खड्डे बुजविण्याचे प्रयत्न करु या. आणि आता जे काही नविन अंदाजपत्रक होईल. त्यात पुर्वीचा रस्ता आणि नविन तयार करायचा रस्ता याच नियोजन करुन काम हाती घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** खडके साहेब अश्या प्रकारचा काही नियोजन करण्यात आलेला आहे का ? की जेथे अन्डरग्राऊंड ड्रेनेजच काम आणि पाणी पुरवठा अमृतच काम पुर्णत्वास आलेल असेल. तर तश्या रस्त्यांची आपण प्रथमिकता ठरविलेली आहे का?

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** भाऊ मी १२ मिटर आणि त्याच्या वरील रस्ते जे आवश्यक आहे. असे रस्त्यांची यादी तयार करायला मी सर्व कनिष्ठ अभियंतांना आदेश दिलेले आहे. आणि त्यांच्या नांवाच्या समोर त्याची अंदाजीत लांबी रुंदी मिनीमम ५०% विडथ एखाद्या वेळेस समजा अन्डरग्राऊंड पाईप लाईनचा काम झाल नसेल. तर पाईप लाईनच काम साईडला असत. १२ मिटरची विडथ असेल तर कमीतकमी ५ ते ६ मिटर विडथचा प्रस्ताव प्रस्तावीत करावा. आणि त्या रस्त्याच्या अनुषंगाने त्या रस्त्यावर अमृतची पाणी पुरवठयाची पाईपलाईन झाली आहे. त्यावर कनेक्शन दिले आहे. त्यावर अन्डरग्राऊड ड्रेनेजचे काम झालेले आहे. हाऊस चेंबर दिलेले आहे. त्यांच्याकडुन असा सर्व्हे मागीतलेला आहे. १२ मिटर व त्याच्या वरचे रस्त्यांची माहिती मागितलेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** साधारणता याला किती कालावधी लागणार आहे.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** तीन चार दिवसात ती यादी फायनल होईल.

**श्री.नितीन लढढा :-** यादी होईल म्हणजे जेथे अमृत आणि याच काम झालेल असेल याची तुम्ही तीन चार दिवसात यादी सादर कराल.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** आपण आपल्या इंजिनिअर्सला असे आदेश दिलेले आहे की, तुम्हाला जे सुचतील तुम्ही स्वत: पाहणी करावी, कोणते रस्ते आवश्यक आहे. अश्या रस्त्यांची टॉप प्रायरीटीची यादी तयार करावी. प्रत्येक प्रभाग निहाय ती यादी झाल्यानंतर त्याची आपण स्क्रुटनी करु, कुठे अमृतची पाईप लाईन झालेली आहे. कुठे अन्डरग्राऊंड ड्रेनेजच काम झालेल आहे. कुठे हाऊस कनेक्शन बाकी आहे. त्या अनुषंगाने आपण सर्व पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊ. त्यानंतर ती यादी फायनल करु. ती यादी फायनल झाल्यानंतर आपल्या पध्दतीने सर्व इंजिनिअर्स लोकांना आदेश दिले जातील. आता ही ढोबळ यादी राहील.ढोबळ अंदाजपत्रक राहील. जेव्हा यादी फायनल होईल. तेव्हा आपण त्यांना असे इनस्ट्रक्शन देणार आहे की, तुम्ही प्रत्येक्ष जागेवर पाहणी करुन रस्त्याला काय प्रोव्हीजन द्यायची आहे. त्यावर असलेले खड्डेंच परिणाम त्या इस्टीमेट मध्ये घ्याव.

नंतर जे फायनल कोट असेल. जे मजबुतीकरणासाठी असेल त्या बाबी त्यांनी अंदाजपत्रकात नमुद करुन अंदाजपत्रक बनवायचे याची सुचना आपण त्यांना देणार आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया, माझी फक्त एकच सुचना आहे एकच मिनीटाची. अश्या पध्दतीने कनिष्ठ अभियंत्यांनी जे अंदाजपत्रक तयार केले असतील. आणि जो कोणी मक्तेदार असेल. जर कधी योग्य पध्दतीच काम नाही झाल. तर त्या कनिष्ठ अभियंत्याला जबाबदार धरण्यात याव. अश्या पध्दतीच्या सुचना आपण आपल्या स्तरावर द्याव्या. जेणे करुन शेवटी बघा. कोणावरती तुम्ही लायबीलीटी फिक्स केल्याशिवाय कोणीही आपल्या कर्तव्याच पालन करतांना दिसुन येत नाही.

**मा.सभापती :-** बरोबर.

**श्री.नितीन लढढा :-** आणि मग काय होत की, वारंवार आपण कोट्यावधी रुपये या कामांवरती खर्च करायच, आणि एक दोन वर्षानंतर त्या रस्त्यांची परिस्थिती जैसे थे वैसी होते. आणि केलेला खर्च हा पाण्यात जातो. आणि या संदर्भात नागरीकांचे टोमणे हे तुम्हाला आम्हाला सगळयांनाच ऐकावे लागतात.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, खडके साहेबांना मी विचारु इच्छितो,

**मा.सभापती :-** बोला विष्णु भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता पर्यंत अमृत योजनेचे कोणत्या कोणत्या एरियात काम चालु आहे. कोणत्या एरियामध्ये अन्डरग्राऊंड ड्रेनेजचे काम चालु आहे.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** अन्डरग्राऊंड ड्रेनेजचे काम जळगांव मुंबई रेल्वे लाईनच्या उत्तरेकडील भागात चालु आहे. शिवाजी नगर ते इंद्रप्रस्थनगर पर्यंतचा भाग,

**श्री.चेतन सनकत :-** सभापती ताई मला बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** विष्णु भाऊ आपला माईक ऑन करा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, मला बोलायचे आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** एक मिनीट नवनाथ भाऊ. खडके साहेब म्हणजे रेल्वे लाईनच्या तिकडेच आता पर्यंत काम चालु आहे अन्डरग्राऊंड ड्रेनेज.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** हो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आपले सिटीतले काम केव्हा सुरु होणार आहे.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** सिटीतले ही काम सुरु होतील, त्यासाठी रुट सँक्शन कराव लागेल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** कारण काय आहे. जेव्हा अन्डरग्राऊंड ड्रेनेजचे काम सुरु होतील. त्यावेळेस आपल्याला वरील रस्त्यांचे काम करणे सोप जाईल.म्हणुन ते लवकरात लवकर आपण ते सुध्दा कराव. अशी मी आपल्या सभागृहास विनंती करतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, अध्यक्ष महोदया,

**श्री.चेतन सनकत :-** सभापती महोदया, मला बोलण्याची संधी द्यावी.

**मा.सभापती :-** बोला बोला नवनाथ भाऊ बोला.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, याच्यावरच मला स्पष्टीकरण नाही मिळाल की, आपण इतर भागात केव्हा सुरु करणार आहोत.

**मा.सभापती :-** द्या खडके साहेब उत्तर द्या. इतर भागात केव्हा सुरु करणार काम.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** भाऊ, आऊटस्कर्ट एरियातुन सुरु कराव लागत अन्डरग्राऊंड ड्रेनेजच काम. त्याला नॅशनल रुलच्या अनुषंगाने जस आपण आता कानळदा रोड के.सी.पार्क पासुन सुरुवात केलेली आहे. तस सिटी एरियाच एक तर महाबळ साईडने किंवा मेहरुण साईडने किंवा खेडी साईडने अस सुरु कराव लागणार.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अच्छा आता किती दिवसानंतर आपण हे सुरु करणार.

**श्री.डि.एस.खडके, शहर अभियंता :-** मी कॅन्ट्रक्टर सोबत बैठक घेतो आणि मग कळवितो आपल्याला.

**श्री.चेतन सनकत :-** ताई, मला बोलण्याची संधी द्यावी. तीन मिटींगापासुन माझे प्रश्न प्रलंबीत आहे. मला बोलण्याची संधी द्यावी.

**मा.सभापती :-** कॉन्ट्रक्टर सोबत बैठक घेऊन सन्मा.सदस्यांना ही माहिती अवगत करुन द्या. नवनाथ भाऊ बोला.

**श्री.चेतन सनकत :-** माझे प्रश्न प्रलंबीत आहे. मला बोलण्याची संधी द्यावी.

**मा.सभापती :-** चेतन भाऊ नवनाथ भाऊंच झाल्यानंतर तुम्हाला ही संधी देते. नवनाथ भाऊ बोला.

**श्री.चेतन सनकत :-** तीन मिटींगापासुन मी प्रश्न विचारत आहे. आता पर्यंत जबाब भेटलेला नाही मला. मागच्या मिटींगला ही त्याच्या मागच्या मिटींगला ही चौथी मिटींग आहे ही, मला आता पर्यंत आयुक्तांकडुन खुलासा भेटलेला नाही.

**मा.सभापती :-** चेतन भाऊंचा प्रश्न असा आहे की, त्यांनी डिझल संदर्भात माहिती मागच्या ४ मिटींगपासुन मागीतलेली आहे. तरी प्रशासनाकडुन त्यांना ती माहिती देण्यात आलेली नाही. डिझेल संदर्भातला खुलासा. मागच्या ४ मिटींग पासुन आमचे सदस्य ही माहिती मागत आहे. पण प्रत्येक वेळी अस सांगण्यात येत आहे की, पुढच्या मिटींग मध्ये माहिती सांगु.

**मा.आयुक्त :-** आजच्या बैठकीला वाहन विभागाचे कोणी नाही. पण वाहन विभागाचे जे सहा.आयुक्त आहे पवन पाटील त्यांना सुचना करतो आणि आपण मागीतलेली माहिती आपल्याला लवकरात लवकर देण्याची त्यांना सुचना करतो.

**मा.सभापती :-** प्रशासनाने या बाबींची दखल घ्यायची आहे की, आमचे सन्मा.सदस्य चेतन भाऊ सनकत मागच्या ४ मिटींगपासुन माहिती मागत आहे. अजुन ही याच उत्तर मिळत नाही. येत्या दोन दिवसाच्या आत त्यांना याची माहिती कळविण्यात यावी.

**श्री.चेतन सनकत :-** ताई, एक मिनीट मी बोलत आहे. मला अशी शंका वाटते की, ४ मिटींगापासुन म्हणजे ४-५ महिन्यापासुन आपल्या दोन तीन मिटींगा झालेल्या आहे. कोरोना मध्ये आपली काही मिटींगा होत नव्हती. म्हणजे किती कार्यकाळ गेलेला आहे अभ्यासासाठी अधिकाऱ्यांना, आणि ठराव मंजुर करतांना मी हे मुद्दे मांडलेले होते. जर कधी आपण वॉटरग्रेस कंपनीला १००-१२५ वाहन दिलेले होते. तर दर वेळेला आपण जितक डिझल मागणी करत आहे. तेवढच डिझल खरेदी करण्यासाठी प्रशासनाकडुन जे डॉकेट आलेल होत. त्याच्यावर तेवढच डिझल खरेदी का ? म्हणजे वाटरग्रेस कंपनी स्वत:चे डिझल खर्च करत होते. म्हणजे १००-१२५ वाहनांमध्ये कॉन्ट्रक्टर डिझल भरत होते. ही बात तर रिकॉर्डवर आहे आपल्या, मग आपल महानगरपालिकेच्या रिकॉर्डवर किती डिझल वाचलेल आहे. आणि आपल किती डिझल खर्च होण बाकी होत. हे सर्व रिकॉर्ड मला का भेटत नाही. म्हणजे डिझल चोरी वगैरा काही झालेल आहे का ? की डिझल घोटाळा झालेला आहे. सहा महिने झालेले आहे मला माहिती भेटत नाही. मला ही शंका येते की, घोटाळा झालेला आहे डिझल खरेदी मध्ये.

**मा.सभापती :-** चेतन भाऊंनी जे जे प्रश्न आता प्रशासनाला विचारले आयुक्त साहेब आपण स्वत: या मध्ये व्यक्तीश: लक्ष घाला. त्यांचे प्रश्न फार संवेदनशील आहे. त्या मागे नेमक काय आहे. याच प्रशासनाने ताबडतोब त्यांना खुलासा द्यावा. नवनाथ भाऊ बोला.

**श्री.चेतन सनकत :-** ताई, विषय असा आहे कारण की, ३० तारखेला आम्ही निवृत्त होत आहोत. बरोबर ३० तारखेच्या आगोदर जर कधी स्टँडींगची मिटींग निघाली, तर मी तेथे हा प्रश्न उपस्थित करेल किंवा महासभेत करेल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** चेतन भाऊ सभापती महोदयांना मिटींग काढायला लावा. मिटींग काढायला लावा.

**मा.सभापती :-** चेतन भाऊ, आपल्याला अजुन १ तारखेपर्यंत अधिकार आहे. आपण तुमच्या या प्रश्नांसाठी एक विशेष मिटींग आयोजित करु या.आणि प्रशासनाला ही सुचना आहे की, पुढच्या मिटींगच्या आत चेतन भाऊंना या प्रश्नांचे उत्तरं कळविण्यात यावे. अन्यथा स्थायीच्या पुढच्या मिटींग मध्ये या विषयाबद्दल चेतन भाऊ आग्रही भुमिका मांडणार आहे.

**श्री.चेतन सनकत :-** ताई मी स्थायी समिती मधुन निवृत्त जरी झाला, तर मी महासभेमध्ये कलम ४४ मध्ये विषय उपस्थित करेल तो माझा कलम ४४ उपस्थित करण्याचा अधिकार आहे. जळगांव शहराच्या जनतेचा विषय आहे महानगरपालिकच्या आर्थिक हिताचा हा विषय आहे.

**मा.सभापती :-** चेतन भाऊ आपल्याला अधिकार आहे तो. आपण कलम ४४ नुसारही प्रश्न देऊ शकता. पुढच्या स्टँडीगला आपण पुढचा विषय घेऊ. आणि त्याच्या आत मला वाटत प्रशासनाने या सर्व प्रश्नांचे उत्तर द्यावे. नवनाथ भाऊ बोला, माईक ऑन करा नवनाथ भाऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, आर.टी.ओ.द्वारे महानगरपालिकेचे पाच वाहने जप्त करण्यात आलेले आहे. ऐकु येत का ? हॅलो , हॅलो

**श्री.विष्णु भंगाळे :-** येत आहे ऐकु येत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आर.टी.ओ.ने महानगरपालिकेचे पाच वाहने जप्त केलेले आहे.फिटनेसमुळे आणि काही प्रमाणपत्रांमुळे, याच्यावर जबाबदारी कोणाची. हॅलो आवाज येत आहे का ?

**मा.आयुक्त :-** आजच्या आपल्या विषयपत्रिकेवर वाहन विभागाचा विषय नसल्यामुळे आपण त्या विभागाचे अधिकारी बोलविलेले नाही. पण आपण जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याची वाहन विभागाकडुन माहिती घेऊ आपण आणि तस काही झाल असेल. तर त्याची पुर्तता करावी लागेल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब आजच्या पेपरला आहे, फिटनेस, प्रमाणपत्र आणि काही आर.टी.ओ.चे चार्जेस आपण भरले नसल्या कारणामुळे आपले पाच वाहने जप्त करण्यात आले आर.टी.ओ. ऑफिसला, आज पेपरला आहे.

**मा.आयुक्त :-** आता महानगरपालिकेच्या वाहनांच्या बाबतीमध्ये जे काही आर.टी.ओ.चे नियम असेल, फिटनेस असेल, त्याचे टॅक्स असेल, हे वेळेच्या वेळेवर भरणे महानगरपालिकेची जबाबदारी आहे. त्याच्यासाठी वाहन विभागाकडे आपण सगळे

अधिकारी नेमलेले आहे. आता याच्यामध्ये जर खरोखर आपण सांगत आहे त्याप्रमाणे जर घडल असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित करुन जे कोणी जबाबदार असतील वेळेत न करणारे त्यांच्यावरती आपण प्रशासकीय कार्यवाही करु.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** दुसरा एक प्रश्न असा आहे की, पंतप्रधान आवास योजना, पंतप्रधान आवास योजना मध्ये सी..एल.टी.सी. सिटी लेवल टेक्नीकल सेल, शहर विस्तारीत तांत्रिक कक्ष उघडण्यात आला होता आपला. हलो आवाज येत आहे का ?

**श्री.चेतन सनकत :-** येत आहे आवाज भाऊ बोला.

**मा.सभापती** :- विषयपत्रिकेवरील जितके विषय आहे त्यानुसारच फक्त अधिकारी वर्ग येथे बोलविण्यात आलेले आहे. त्यामुळे काय होणार आहे की, आपण हे प्रश्न उपस्थित केल्यानंतर ही त्याला प्रशासनकडुन समर्पक उत्तर मिळणार नाही. आता आपण प्रशासनाला अशी सुचना देऊ या की, पुढच्या स्थायीच्या मिटींगमध्ये सगळे विभागांचे प्रमुख उपस्थित राहण्याचे आदेश देऊ या. म्हणजे आपले चर्चेला काही तरी निष्पन्न होऊ शकेल.नाही तर ही फक्त वांझोटी चर्चा होणार आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** बरं, धुर फवारणीच्या संदर्भात, मलेरियाच्या संदर्भात विचार करण्यात यावा स्थायी मध्ये.

**मा.सभापती :-** प्रशासनाने आता या सगळया सुचनांची दखल घ्यायची आहे. आताची परिस्थिती बघता, मलेरिया,डेंग्यु या आजारांचे प्रमाण बघता, धुर फवारणी बद्दल जी नवनाथ भाऊंनी सुचना मांडलेली आहे. त्या संदर्भात त्या विभागास आदेश देण्यात यावे. आणि पुढच्या स्टँडींगला सर्वच विभाग प्रमुखांना बोलविण्यात याव. ज्याही सदस्यांचे वेळेवर काही प्रश्न जर असतील तर त्याचे उत्तर प्रशासनाला देता येईल.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया,

**मा.सभापती :-** बोला नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया, आता अजेंडयावरचे संपुर्ण विषय जवळपास संपुष्टात आलेले आहे.

**मा.सभापती :-** हो.

**श्री.नितीन लढढा :-** मला फक्त प्रशासनाला एक प्रश्न उपस्थित करायचा आहे की, आता महानगरपालिका प्रशासनाने जळगांव शहरातील जे खाजगी मार्केटस आहे किंवा इतर संपुर्ण मार्केटस आहे. ते शनिवार आणि रविवार बंद ठेवण्याच्या मागची भुमिका जी आहे.याच नेमक उद्दिष्ठ काय ? आणि त्याच्याने कोरोनाच्या साथीवरती नियंत्रण मिळवता आलेल आहे का ? तर या संदर्भात मा.आयुक्त महोदयांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त :-** राज्य शासनाने मिशन बिगीन अगेन जो सुरु केलेल आहे. त्याच्या मध्ये टप्प्या टप्प्याने सर्व व्यवहार सुरळीत करा. अश्या प्रकारच्या सुचना दिलेल्या आहे. याच्यामध्ये सुरुवातीला आपले जे शॉपिंग कॉम्प्लेक्स किंवा मॉल होते. हे बंद ठेवुन अन्य जी दुकाने आहे. ती अल्टरनेट डे उघडावी की, जेणे करुन सात दिवसामधुन तीन ते चार दिवस दुकाने उघडी राहतील. तीन ते चार दिवस बंद राहील. त्या निमित्ताने तीन चार दिवस का असे ना. शहरामधील व्यवहार हे थोडेशे बंद राहतील. आणि कोरोनाचा संसर्ग काटोकाट आणण्यामध्ये मदत होईल. त्यानंतर जेव्हा आपले सगळे शॉपिंग मॉल सुरु झाले. त्याच्या नंतर आपण शॉपींग मॉलला सुध्दा अल्टरनेट डे उघडण्याची परवानगी दिली होती. याच्या नंतर या संदर्भामध्ये आपल्या शहरामधले जे व्यापारी आहे. यांनी अनेक वेळेला महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडे या संदर्भातली निवेदने दिलेली होती की, विशेषता ग्रामीण भागातुन येणारे लोकांना एक दिवशी दुकान बंद असल्यामुळे नेमक कुठल्या दिवशी जायच कुठल्या दिवशी नाही. कुठल दुकान उघड राहणार कुठल बंद राहणार. या विषयी खुप गैरसमज होत आहे. आणि सगळयांचीच त्याच्यामध्ये गैरव्यवस्था होत आहे. तर त्यासाठी म्हणुन जर महानगरपालिकेन आणि जिल्हाधिकारी यांनी सलग आम्हाला पाच दिवस परवानगी दिली आणि दोन दिवस बंद ठेवल, तर आधीच्या धोरणामध्ये आपण तीन दिवस बंद ठेवणार होतो. आताच्या धोरणामध्ये दोन दिवस बंद राहील. पण जर एकाच दिवशी संपुर्ण शहर बंद राहील तर येणाऱ्यांना घराबाहेर पडणाऱ्यांना नागरीकांना सुध्दा त्याचा चांगला फायदा होईल. आणि मग एकाच कारणासाठी म्हणजे आज एक दुकान बंद आहे म्हणुन दुसऱ्या दुकानातुन खरेदी करायला बाहेर पडायच, पुन्हा दुसऱ्या दिवशी हे दुकान उघड असेल म्हणुन त्या दुकानातुन खरेदी करायला बाहेर पडायच अस नागरीकांना वारंवार बाहेर पडायला लागु नये. म्हणुन आम्हाला तुम्ही सलग पाच दिवस दुकान उघडण्याची परवानगी द्यावी. अश्या प्रकारची मागणी जिल्हाधिकारी आणि महानगरपालिकेकडे केलेली होती. अनेक लोकप्रतिनिधींकडे ही केलेली होती. या संदर्भामध्ये आमची जिल्हाधिकाऱ्यांकडे चर्चा झाली आणि या चर्चेमधुन आपण सलग पाच दिवस दुकाने उघडे ठेवायला आपण परवानगी दिलेली आहे. आणि दोन दिवस शनिवार रविवार बंद ठेवायच्या. अर्थातच आता याच्यामध्ये जेवढा वेळ आपण लोकांना रस्त्यावरती येण्याची वेळ कमी आणु तेवढ कोरोनाचा संसर्ग कमी होणार आहे ही उघड आहे.

**श्री.नितीन लढढा :-** हे उद्दिष्ट तरी १००% पाळले जात आहे का ?

**मा.आयुक्त :-** काय म्हणत आहेत आपण ?

**श्री.नितीन लढढा :-** याच्या मागचा जो उद्दिष्ट आहे की, या दोन दिवसात नागरीकांनी कमीतकमी रस्त्यावर याव. हे उद्दिष्ट तरी आपल पुर्ण होत आहे का ?

**मा.आयुक्त :-** आता याच्या  मध्ये दोन गोष्टी आहे. हे धोरण आपण आखुन दिलेल आहे. या धोरणाची इतक्या कडकपणे अंमलबजावणी होणे ही गरजेचे आहे. त्याच्या मध्ये महापालिका असेल पोलिस प्रशासन असेल, जिल्हाधिकारींच प्रशासन असेल, सगळे जण प्रयत्न करत आहे. परंतु आताची परिस्थिती आपण जे पाहत आहे. याच्या मध्ये स्वंयशिस्त अतिशय महत्वाची आहे. प्रत्येकाने याच्या बाबतीत जस आपण म्हणत आहे. माझे कुटुंब माझी जबाबदारी, प्रत्येकाने आपआपल्या कुटुंबाची जबाबदारी घेतली. याच्या मध्ये १००% उद्दिष्ट पुर्ती होणार आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.साहेब, परंतु हे फक्त जळगांव मध्ये आहे पुणे मध्ये किंवा यापेक्षा अधिक संख्या ज्या ज्या शहरामध्ये आहे.तिथे संपुर्ण आठवडयाचे संपुर्ण मार्केट सुरू आहेत.मग हे विशिष्ठ धोरण फक्त जळगांव शहरासाठीच लागू केले आहे का ?

**मा.आयुक्त :-** नाही ,आता शासनाने जे धोरण घालुन दिलेले आहे.ते संपुर्ण राज्यासाठी आहे आणि त्या त्या ठिकाणी जिल्हाधिकारी असतील किंवा महानगरपालिका असेल यांना मुभा दिलेली आहे की तुम्ही स्थानिक परिस्थिती बघुन याच्या मध्ये नेमकी या धोरणाची अंमलबजावणी कशी करायची आहे याबाबत तुम्ही ठरवा. त्यामुळे प्रत्येक जिल्हयामध्ये किंवा शहरा शहरामध्ये किरकोळ स्वरूपामध्ये हा बदल असणं साहजिक आहे.

**श्री.नितीन लढढा :-** हो ना, परंतु पुण्यासारख्या शहरामध्ये आपल्यापेक्षा मोठया संख्येने रूग्ण तेथे निघताहेत , परंतू तेथेहि सातही दिवस व्यापार सुरू आहे. गर्व्हनमेंट चे मिशन अगेन याचा अर्थ काय आहे ? आता मला सांगा की राज्यातल्या राज्यात रेल्वे सुरू झाल्या आहेत.बसेस सुरू झाल्या आहेत. खाजगी बसेस सुरू करण्यासंदर्भातली भुमिका आहे. फक्त आपल्या येथीलच एक वेगळे धोरण का दिसत आहे . म्हणजे त्याच्याने फायदा कमी होतोय की याचा येथील नागरीकांना व व्यापाऱ्यांना त्याचा फार मोठया प्रमाणावर त्रास होतोय .

**मा.आयुक्त :-** नाही , वेळोवेळेला याच शासनाच्या पातळीवर असेल किंवा जिल्हाधिकारी यांच्या पातळीवर असेल त्याचा आढावा घेतला जातो. कुठल्याही सुचना हया अर्थातच कायम स्वरूपी नसतात. त्या त्या वेळेची परिस्थिती विचारात घेवुन त्याच्यामध्ये आवश्यक ते फेरबदलही केले जातात.त्यामुळे आताच जे धोरण आहे. हया धोरणामध्ये अशी काही परिस्थिती उदभवली . तर आपल्याला त्याचा फेरविचार सुध्दा करता येईल.परंतू राज्य शासनाचे धोरण असे आहे की टप्याटप्याने हे उघडे करा. म्हणजे एकदमच पुर्ण . .

**श्री.नितीन लढढा :-** हो ना .

**मा.आयुक्त :-** पुर्ण न करता टप्याटप्याने उघडावे . त्यामुळे आज आपण हे केले आहे की ५ दिवस उघडे आणि २ दिवस बंद

**श्री.नितीन लढढा :-** हो ना , पण आज आत्ता काय झालय की संपुर्ण जग पुढे निघुन गेले आहे आणि आपल जळगांव शहरच मागे आहे ही प्रक्रीयेच्या राबविण्याच्या अंतर्गत  म्हणजे आज आपण जिथे पाहतो आहेत.

**मा.आयुक्त :-** ऐका ना .

**श्री.नितीन लढढा :-** नाही नाही आयुक्त महोदय , आपण ज्या खाजगी दुकानांचे साधारणत: आठवडयातील दोन दिवस बंद म्हणजे महिन्यात ८ दिवस त्यांचा व्यापार बंद असतो. या ८ दिवसाच्या व्यापारामध्ये त्यांच्या कर्मचाऱ्यांना पुर्ण महिन्याचा पगार अदा करावा लागतो. दुसरे पुर्ण महिन्याच ईलेक्ट्रीक चे बिल ज्याला फीक्स चार्जेस असतात ते एमएसईबी कुठे कमी करत नाही. मग अश्या पध्दतीने जळगांव साठीच हे विशिष्ठ धोरण राबविण्याच्या मागची भुमिका काय ? आणि याच्या मागच कारण की आपण याच्यावर कार्यवाही करतो . ज्या दुकांनावर शोसल डिस्टंसिंग मेन्टेन होत नाही अश्या पध्दतीने आपले उपायुक्त महोदय कारवाई करतात.त्याच्या कारवाई बद्दल दुमत नाहीये. आणि हया शोसल डिस्टंसिंग अनुषंगाने आपण कारवाई करत असतो नेमक जी अंमलबजावणी करणारे अधिकारी आहेत. म्हणजे जळगांव शहर महानगरपालिका यांना ईम्पिलीमेंटेशन अथॉरिटी आहे आणि स्वत: जळगांव शहर महानगरपालिका या ईम्पिलीमेंटेशनच स्वत: जेव्हा उल्लंघन करते त्याच्या संदर्भातील प्रशासनाची भुमिका काय आहे. म्हणजेच आपण आत्ता ४ दिवसांपुर्वी  महानगरपालिकेच्या या सभागृहामध्ये आढावा बैठक घेतली . कुठल्या प्रकारच्या शोसल डिस्टंसिंग चे पालन झालेले होते. ज्यावेळेला सभागृहात आलो. मला ही वाटले की कुठेतर शोसल डिस्टंसिंग चे पालन होत नाहीये. अश्या पध्दतीचे सभेचे आयोजन करण्यात आलेले असेल परंतू तेथील परिस्थिती पाहील्या नंतर सन्मा.सदस्य. कैलास आप्पा सोनवणे यांनी स्वत: त्या सभागृहात भुमिका मांडली कि या सभागृहात कमीत कमी ५ टक्के हे लोकं पॉझिटीव्ह असतील. त्यावेळेला सन्मा.सदस्य अश्या पध्दतीची सुचना मांडत असतील आणि त्यांच्या सुचनेला दुर्लक्ष करून अश्या पध्दतीच्या सभा राबवल्या जात असतील. मग एक प्रशासन सामान्य दुकानदारांना आणि सामान्य नागरीकांना वेगळा न्याय लावतय आणि महानगरपालिकेला वेगळा न्याय का?

**मा.आयुक्त :-** नाही महानगरपालिका आपण घातलेल्या बंधनांच कुठेही उल्लंघन करत नाही प्रत्येक ठिकाणी आपली कुठलीही बैठक असेल औपचारीक , अनौपचारीक याच्यामध्ये आपण डिस्टंसिंग असेल किंवा मास्क असेल.

**श्री.नितीन लढढा :-** कुठले शोसल डिस्टंसिंग होते ? एका एका बंचेंस वर दोन दोन सदस्य मी स्वत: बसलेलो होतो आणि ज्यावेळेला कैलास आप्पांनी ही भुमिका मांडली की या सभागृहात कमीत कमी ५ टक्के सदस्य पॉझीटिव्ह असतील किंवा उपस्थित असणारे अधिकारी कर्मचारी जे कोणी असतील ही शंका उपस्थित करताच मी सभागृहातुन बाहेर पडलो. म्हणजे सामान्य माणसांच्या दुकानामध्ये जर कधी ५ पेक्षा जर ६ वा माणुस दिसला ग्राहक दिसला किंवा कर्मचारी दिसला तर आपण त्यांचे दुकान सिल करतो .मग आपण महानगरपालिकेचे सभागृह का सिल नाही केले ? म्हणजे ज्या वेळेला प्रशासन दुसऱ्यांना ज्या अपेक्षित गोष्टी असतात. ज्या वेळेला आपण समाजाला एक दिशा देण्याच काम करत असतो. त्या वेळेला त्या स्वयमशिस्तीच पालन आपण पहिले आपल्याकडुन सुरु करणे अपेक्षित असते. म्हणजे सामान्याला एक न्याय आणि आपल्या स्वत:ला एक न्याय ही भुमिका मात्र चुकीची आहे.

**मा.सभापती :-** नितीनभाऊ आपण आता जे मार्केटचा विषय मांडलेला आहे. फक्त शनिवार रविवार मार्केट बंद असते. या तुमची भुमिकेशी मी १००% सहमत आहे. सगळीकडे जर मिशन बिगीन अगेन सुरु झालेल आहे तर जळगांवला वेगळा न्याय असायला नको. ते आपल म्हणण अगदी रास्त आहे. व्यापाऱ्यांच्या दृष्टीने जी आपण भुमिका मांडलेली आहे त्याला आम्ही सुध्दा समर्थन करत आहोत. पण आपण या गोष्टीच एक्सप्लेनेशन देतांना जे उदाहरण देत आहात की, महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये नुकतीच झालेली बैठक. मला वाटत त्या बाबतीत आपण हे लक्षात घेतल पाहिजे की, केंद्राचे जे आता निर्देश आहेत. तुमची सभागृहाची जी कॅपॅसीटी आहे. त्या कॅपॅसीटीच्या निम्मे सदस्य जर असतील, ते कोणताही कार्यक्रम, आता आपण लग्नाबद्दल ही केंद्राचे आदेश बघितलेले आहे. कि पुर्वी जे निवडक फक्त ५० वऱ्हाडी मंडळी असावी असे आदेश होते. ते असे झालेले आहे की, आता तुम्ही जे कार्यालय घेतात. त्या कार्यालयाची जी कॅपॅसीटी आहे तेथे त्या पैकी उपस्थिती निम्मी असावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदया , मी आपल्या विषयाशी सहमत. .

**मा.सभापती :-** नितीनभाऊ आपण तरी त्या बैठकीवर आक्षेप घेवु नये आम्ही सुध्दा आपल्या मुद्याशी सहमत आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदया , मी आपल्या व्यक्तव्यांशी १०० टक्के सहमत आहे. परंतू ५० टक्के उपस्थितीचे पालन झाल्याचे दिसुन येत नाही. आपण रेकॉंर्डींग बघावे , फुटेज काढावे आणि १०० टक्के . .

**मा.सभापती :-** नितीनभाऊ ५० टक्क्यांपेक्षा उपस्थिती त्या दिवशी नव्हती . .

**श्री.नितीन लढ्ढा :-** मॅडम आपण बघा की, सदस्य उपस्थित कमी होते परंतू संपुर्ण खातेप्रमुख , पत्रकार बांधव , सन्मा.सदस्य, अधिकारी वर्ग पुर्ण सभागृह हे १०० टक्के उपस्थित झालेले होते, आपण व्हिडीओ रेकॉर्डींग सुध्दा बघुन घ्यावी. म्हणजे प्रशासनाच्या डोळयासमोर

**मा.सभापती :-** काय होतय नितीनभाऊ की आपण जे . .

**श्री.नितीन लढ्ढा :-** मॅडम आपण. .

**मा.सभापती :-** नितीन भाऊ होत काय की तुमचा आणि माझा मुद्दा एकच आहे आणि त्या मुद्दयावरून आपण दुसरीकडे भरकटत आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला त्याविषयावर राजकारण करायच नाहीये. माझी भुमिका त्याच्या संदर्भातील अत्यंत स्पष्ट आहे, की एखादया सामान्य दुकानदाराला आपण ज्यावेळेला एक न्याय लावतो की तो विनवन्या करतो की, माझ्या दुकानाबद्दल मला सांगा की, दुकानात असलेले कस्टमर आणि दुकानाचे मालक व कर्मचारी हिच मुळात ३ ते ४ ची संख्या होवुन जाते, एकाच वेळेला दोन तीन ग्राहकांनी गर्दी केली ग्राहकाला तो धक्के मारून बाहेर काढु शकत नाही. परिस्थिती ईतकी धंदयाची वाईट झालेली आहे. की गाळेधारकांचा दिवस प्रतिक्षेमध्ये जातोय अणि नेमके की त्यावेळी काही गिऱ्हाईक आले आणि त्याच वेळेला मनपा प्रशासनाचे पथक तिथे पोहचले तर विनाकारण तो माणुस दिवसातुन हजार रुपये कमवतो आणि त्याला ५ हजार रू दंड भरवा लागतो. त्याला जर ५ पेक्षा संख्या १ जास्त असली तर त्याला दंडात्मक कार्यवाही, आपण निम्यचे समर्थन करीत आहे मी पण करतो. परंतु आपल्या सभागृहातली संख्या आणि सभागृहात उपस्थित असलेली व्यक्तींची संख्या ही १००% पुर्ण होती. म्हणुन म्हणतो सामान्याना सुध्दा न्याय देतांना कुठेतरी त्याच्या बाबतीत ही एक सकारात्मक दृष्टीकोण ठेवुन विचार करायला हवा. कायदा आहे पण कुठेतरी मानवता सुध्दा ही डोक्यामध्ये असावी, आता मला सांगा आपण रस्त्यावरच्या अतिक्रमण धारकांकडुन पाच पाचशे रुपयांच सामान उचलुन आणतो, कोणाचा भाजीपाला असतो तो कर्ज बाजारी माणुस असतो. नौकरी नाही, व्यवसाय नाही. हजार दोन हजार रुपये इकडुन तिकडुन आणुन व्यवसाय करतो. आणि धडाधड आपण गाडयांमध्ये फेकतो. मी काल मिटींगला आलो होतो महापालिकेत त्या वेळेला बघितल, काही वांग्यांचे टोपले भरलेले आहे, काही छोटे छोटे किरकोळ साहित्य यांचे भरलेले आहे. अश्या पध्दतीने सामान्य माणसाच जिवन जगण हे कठीण होऊन गेलेल आहे. म्हणजे फक्त कायद्याच्या नावा खाली फक्त गरीबांवरच अत्याचार करायचा का ? असा प्रशासनाने मनामध्ये काही विचार करुन ठेवलेला आहे का ?

**श्री.संतोष वाहुळे :-** सन्मा.सभापती महोदया, आदरणीय सभागृह आता मा.नितीन भाऊंनी जो विषय मांडला, आम्ही कार्यवाही करणेसाठी कुठलीही भुमिका जो मांडतो, तेव्हा ती व्यापक जनहित लक्षात घेऊनच आम्ही घेत असतो. जेव्हा एखाद्या ठिकाणी क्षमतेपेक्षा जास्त लोकांचा भरणा असतो. त्या ठिकाणी निश्चितपणे कार्यवाही करणे गरजेच आहे. आयुक्त साहेबांनी जस सांगितल की, आपण सर्वांनी आता सेल्फडिसीप्लीन मोडवर जाणे गरजेच आहे. फक्त ते दुकानदारांनाच लागु नाही तर रस्त्यावर जे हॉर्कस असो किंवा महानगरपालिका प्रशासनाचे म्हणजे सर्वांनीच म्हणजे मी रिस्पेक्टीव्ह कुठल्याही गोष्टी हे न करता. सर्वांनी त्याच पालन करणे गरजेच आहे. आता मुद्दा आहे की, ज्या लोकांवर आपण कार्यवाही करतो, तरी कार्यवाही करत असतांना छोटे मोठे अस कुठलही भेदभाव आपण करत नाही. ज्या ठिकाणी गर्दीची जास्तीत जास्त शक्यता आम्हाला दिसुन येते. आम्ही त्याच विडीओशुट करतो, आणि त्यानंतरच आम्ही ती कार्यवाही पुर्णत्वास नेतो. आता आपण स्वत: मार्केट मध्ये पाहिल असेल. खुप मोठया प्रमाणात वरदळ नागरीकांची आहे. छोटयाछोटया गोष्टी घेण्यासाठी सर्व कुटुंब येतात. त्यामुळे कुठलाही प्रकारे प्रशासन हेतुने कार्यवाही करत नाही. आपल्याकडे जेव्हा पुरावे आणि जागेवरती गर्दी असते. त्याच वेळेला आम्ही कार्यवाही करतो. आणि याच्या मध्ये कुठलाही हेतु ठेवुन आम्ही कार्यवाही करत नाही. हे निश्चितपणे मी आपल्याला सांगु शकतो.

**श्री.नितीन लढढा :-** मा.वाहुळे साहेब आपण चुकीच काम करत आहे त्याच्या संदर्भातली माझी भुमिका नाही. आपण आपल्या कर्तव्याच पालन करत आहे योग्य पध्दतीने करत आहे. त्याच्या संदर्भातही आक्षेप नाही. माझा आक्षेप हा आहे की, न्याय देतांना एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला दुसरा न्याय ही भुमिका जी आहे त्या भुमिकेच्या अनुषंगाने माझा रोख आहे की, ज्या वेळेला सोशल डिस्टंसींगच पालन महानगरपालिकेच्या सभागृहात त्याच उल्लंघन होत असेल. तर त्यावेळेला प्रशासनातील संपुर्ण अधिकारी येथे उपस्थित असतांना जेथे आपल्याला गर्दी दिसते तेथे आपण कार्यवाही करता, अत्यंत नियमानुसार कार्यवाही करता, त्याच्या बद्दल वाद नाही. ती योग्य भुमिका आहे आपली ती आपण करावी. परंतु परवाच्या आढावा बैठकीमध्ये आपण ही स्वत: तेथे होतात. आणि ज्या वेळेला कायदा एकाच गोष्टीला धरुन आहे की, सोशल डिस्टंसींगच व्हायलन्स होत असेल, म्हणजे म.न.पा.ला त्याच्यातुन काही माफी देण्यात आलेली आहे. असे जर काही राज्य शासनाच्या सुचना असतील, तर निश्चितपणे त्या सुचना आपण मला अवगत करुन द्याव्या. म्हणजे जर एकीकडे आपण जर सामान्य ग्राहकांवर कार्यवाही करतो. मी त्याच समर्थन करतो, तुम्ही चुकीची कार्यवाही करत आहे मी हे बोललेलो नाही. परंतु ज्या वेळेला मनपा प्रशासन आणि या सभागृहामध्ये कुठेतरी सोशल डिस्टंसींगच व्हायलन्स होत असेल, बेकायदेशीर ती सभा होत असेल, त्या वेळेला प्रशासन त्या सभेमध्ये शामील होऊन प्रशासन त्या भुमिकेचा समर्थन कुठल्या अर्थाने करतो, त्याच्या संदर्भातली भुमिका आपण स्पष्ट करावी.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया, सभापती महोदया,

**मा.सभापती :-** बोला बोला राजु पाटील साहेब,

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया, श्री.नितीन भाऊ लढढा यांनी जो विषय मांडला, जी आपले उपायुक्त साहेब कार्यवाही करत आहे. ठिक आहे त्यांनी ती मांडायला हरकत नाही. कोणावर अन्याय ही होत असेल, आणि काही वेळेस कठोर निर्णय घ्यावे लागतात, शासनाचे ही आदेश आहे, आणि जर का प्रशासनाने दर्लक्ष केल, तर त्यावर ही टिका टिप्पणी आपल्या सारख्यांच्या माध्यमातुन होते. मग त्यांनी नेमक काम कराव की, बंद कराव. आणि आपण जे उदाहरण दिल, मला वाटत ते योग्य नाही..मला वाटत पुर्ण सभासद नक्कीच सभेमध्ये उपस्थित नव्हते. महत्वाचे पदाधिकारी तेथे उपस्थित होते. आणि आपण स्वत:ही त्या सभेमध्ये उपस्थित होतात.आपण आता हा मुद्दा मांडला, कदाचित त्याच दिवशी आपण हा मुद्दा मांडला असता, जी अपेक्षित लोकं नव्हती त्यांना प्रशासनाने बाहेर काढल असत, आणि जी अपेक्षित लोक असती तिच त्या सभेला उपस्थित राहु शकली असती, तर आपण त्याच दिवशी हा मुद्दा लक्षात आणुन द्यायला हवा होता. ही आपली जबाबदारी होती, ठिक आहे काही हरकत नाही. पण मी या नंतरही सांगेल, आपण सोशल डिस्टंसही पाळतो, सोशल डिस्टंसींगच्या माध्यमातुन आपण सभा घेतो. सभा आटोपल्यानंतर आपण पदाधिकारी अधिकाऱ्यांसोबत गप्पा मारतांना सोशल डिस्टंसींग पाळल जात का ? याचा ही आपण विचार केला पाहिजे. त्यावेळेला आपण चार लोक मास्क काढुन एका ठिकाणी उभे राहतात, चर्चा करतात, सोशल डिस्टन्सींगचे तीन तेरा होतात, मला वाटत अधिकाऱ्यांनी आपल्यावर कार्यवाही करायला हवी का ?

**श्री.नितीन लढढा :-** निश्चितपणे अधिकाऱ्यांनी त्यांच्या कर्तव्याच पालन करायला पाहिजे. सभागृहातली जबाबदारी ही प्रशासनाची होती.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका ना, तुम्ही बोलत होते तेव्हा मी मध्ये बोललो नाही, माझ्या बोलण आटोपल्यानंतर तुम्ही बोला ना, आम्ही तुम्हाला शांतपणे एकुन घेतल. आपण ही ऐकुन घ्या. त्या दिवशी सर्व सन्मा.सदस्यांनी चेहऱ्यावर मास्क लावुन उपस्थिती दिली आहे. ईवन जो कोणी व्यासपीठावर बसलेले होते, त्यांनी ही मास्कचा वापर केलेला होता. सन्मा.सदस्यांनी मास्कचा वापर केलेला होता. आपण जे म्हणतात की, एका बेंचवर दोन, मला वाटत आपला बेंचही ५-६ फुटाचा आहे. आणि

एका बेंचवर दोन लोक जरी बसले, तरी एक या कोपऱ्याला आणि दुसरा त्या कोपऱ्याला, तर मला वाटत, सोशल डिस्टंसींगच कुठेही उल्लंघन होत नाही. कदाचित जवळ जवळ आले असतील तर एखादी होऊ शकते घटना, परंतु त्याच ऐवढ बाऊ करण्याच मला वाटत कारण नाही. तर आपण जेष्ठ आहात. आणि आम्ही तुमचा आदर करतो, तरी ही उदाहरण देणे मला वाटत योग्य नाही. जरी कुठेतरी कोणावर अन्याय होत असेल तर न्याय विषयी वाचा फोडा, परंतु कुठेही चुकीचे आरोप करु नये अशी आपल्याला विनंती आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** राजु भाऊ पुढे सभापती व्हायच आहे का ?

**मा.सभापती :-** हा विषय आपला फार वेगळया दिशेने जात आहे. नितीन भाऊंचा मुळ हा विषय काढण्या मागचा उद्देश हा होता की, शनिवार रविवार जे मार्केट बंद राहणार किंवा काही दुकानदार जे नियम घालुन दिलेले आहे ते नियम मोडुन त्यांच दुकान सुरु ठेवतात. कारण मार्केट बंद मुळे त्यांना जो त्रास होत आहे. किंवा त्यांच जे आर्थिक नुकसान होत आहे. त्याच्याकडे लक्ष वेधण प्रशासनाच हा मला वाटत तुमचा उद्देश होता.

**श्री.नितीन लढढा :-** माझा उद्देश तोच होता आणि उदाहरण म्हणजे मा.आयुक्त महोदयांनी ज्या पध्दतीने भुमिका विषेद केली, त्यामुळे मला हे उदाहरण देणे गरजेच वाटल, अन्यथा मला हा विषय काढण्याच्या संदर्भात माझी भुमिकाही नव्हती.

**मा.सभापती :-** आपण खरं तर पुन्हा मुळ मुद्दयावर आल पाहिजे.आपण विषयांतर खुप चर्चा होत आहे की, मुळ मुद्दा हा आहे की, जळगांव शहराला शनिवार रविवार मार्केट बंद हा वेगळा नियम का ? तर प्रशासनाने आपल्या या म्हणण्याची दखल घ्यावी. आणि हा विषय प्रशासनाने शासन दरबारी मांडावा, जर आपणच असा प्रस्ताव पाठविला असेल, म्हणजे महानगरपालिका क्षेत्र म्हणुन आयुक्त साहेब प्रमुख आहे, कलेक्टर साहेब आहे. तर यांच्याकडुन जर असा प्रस्ताव गेला असेल शासनाकडे की, शनिवार रविवार मार्केट बंद राहील. आणि इतर पाच दिवस वर्कीग राहील. तर ते आपणच एकदा शासनाला कळवाव की, यामुळे नुकसान होत आहे. कारण शासनाचे जी काही इतर शहरांसाठीचे आदेश आहे. ते कलेक्टर साहेबांना आयुक्त साहेबांनी लक्षात आणुन द्याव. तेच आदेश आपल्या शहरात सुध्दा लागु झाले पाहिजे. मला वाटत या नोटवर आपण हा विषय थांबवावा. याच्या व्यतिरिक्त जर कोणाला काही बोलायच असेल तर बोला.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदया, प्रशासनाने या विषयावर तातडीने निर्णय घ्याव, कारण शेवटी बघा, आज अत्यंत वाईट अवस्थेतुन व्यापारी वर्गाची परिस्थिती चालु आहे.

**मा.सभापती :-** हो नितीन भाऊ, या विषयाच्या संदर्भात आपण खुप चांगली आणि सविस्तर भुमिका मांडलेली आहे. आणि आम्ही सुध्दा आपल्या या भुमिकेशी सहमत आहोत. आपण सगळे हे एकमुखाने आयुक्त साहेबांकडे ही मागणी करीत आहोत की, या विषयाचा आयुक्त साहेबांनी ताबडतोब सोक्षमोक्ष लावावा.आणि अर्थातच ते या दृष्टीने लावावा की, शनिवार रविवार सुध्दा पुर्वी सारख, आता मिशन अनलॉक म्हटल्यानंतर अनलॉक या दृष्टीनेच वाटचाल आपल्या शहराची सुध्दा असली पाहिजे. तर आयुक्त साहेबांना एक मुखाने आपण मागणी करु या. ही सर्वांच्या वतीने मी सभापती म्हणुन आयुक्तांना मागणी करीत आहे की, या संदर्भातली पुढे काय कार्यवाही करायची, कलेक्टर साहेबांशी काय बोलण करायच. काय मिटींग घ्यायची आहे या संदर्भात त्यांनी ताबडतोब नियोजन कराव. या कामी लोकप्रतिधी म्हणुन प्रशासनाला आमच्याकडुन जे काही सहकार्य प्रशासनाला आवश्यक असेल,ते सहकार्य द्यायला आम्ही कायमच तयार आहोत. तर या विषयाचा लवकरच निर्णय घेण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय मला काही बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** बोला बोला नवनाथ भाऊ बोला .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मोकाट कुत्र्यांचा विषय केव्हा संपणार, मोकाट कुत्र्यांच्या संदर्भात जळगांव शहर, अध्यक्ष महोदया, मोकाट कुत्रे. प्रशासन त्याच्यावर काय कारवाई करत आहे.

**मा.आयुक्त :-** याच्या संदर्भामध्ये परवा जी मा.महापौरांचे अध्यक्षते खाली मिटींग झाली, सभागृहामध्ये बैठक झाली. त्या वेळेला सविस्तर आपल्याला सगळ सांगितलेल आहे नवनाथ भाऊ याच्या संदर्भात जी संस्था आपल्याकडे काम करत होते. त्या संस्थेच्या संदर्भामध्ये आपल्या शहरामध्ये काम करणाऱ्या काही प्राणी मित्र संघटनांनी डिटेल मध्ये एक ई-मेल हा केंद्र सरकारच्या संस्थेला सन्मा.खासदार मनेकाजी गांधी मार्फत पाठविला होता. त्याच्या संदर्भामध्ये अश्या प्रकारच्या काम करणाऱ्या संस्थांना जी लायसन्स देणारी संस्था आहे. ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया त्यांच्या पत्रामध्ये त्यांनी अस नमुद केलेल आहे की, संस्था ॲनिमल बर्थ कन्ट्रोल नियमाचा उल्लंघन करत असल्यामुळे महानगरपालिकेने ताबडतोब त्यांच काम टरमिनेट कराव.तुमच्या क्षेत्रामध्ये त्यांना ब्लॅकलिस्ट कराव. आणि त्यांची चौकशी करावी. आता त्यामुळे आपल्याला या संस्थेच कामकाज पुढे चालु ठेवणे शक्य नाही. त्या संदर्भामध्ये आता आरोग्य खात्याकडुन नव्याने निविदा प्रक्रिया राबवुन आपल्या नविन संस्था निवडीची प्रक्रिया सुरु करावी लागणार आहे. आणि तशी कार्यवाही आरोग्य खात्या मार्फत करण्यात येईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** दुसरा विषय असा,शिवाजी नगर उड्डाणपुलाच काम चालु आहे शिवाजी नगर कडुन, ते तुमच्या बंगल्यापासुन शिवाजीनगरला वळविलेला रस्ता आहे जड वाहनांसाठी, तिथे परिस्थिती अशी आहे की, तीन ते चार फुट खड्डे झालेले आहे. तुम्हीपण शिवाजीनगर कडुन गेले होते. पाऊस पडल्यामुळे आता तुम्ही दुसरा रस्ता बदलविला. त्या रस्त्याची हालत अशी आहे आता की, परिस्थितीनुसार आम्ही आंदोलन करणार आहे. तो रस्ता बंद करणार आहे. मग आपले जड वाहने जाण्यासाठी तो मार्ग बंद होईल. तेथे लवकरात लवकर पाहणी करुन त्याचा निर्णय घेण्यात यावा. शिवाजी नगर मधला रस्ता.

**मा.आयुक्त :-** जरुर, शहर अभियंतांना या वेळी पुर्वीच सुचना दिलेल्या आहे. जो पुर्वीचा मेन रोड आहे, कानळद्याकडुन येणारा, तो खुपच खराब झालेला आहे. तर त्याच्यामध्ये खडीकरणाचे काम करण्याची सुचना त्यांना देतो मी.

**श्री.नितीन लढढा :-** आयुक्त साहेब, मार्ग बदलु नका, मार्ग बनवा.

**मा.आयुक्त :-** नितीन भाऊ मार्ग बदललेला नाही, परंतु शॉर्टकट काढलेला आहे.

**श्री.नितीन लढढा :-** आयुक्त साहेब आपल्या वरती आमचे नवनाथ भाऊंच खुप बारकाईने लक्ष असत. तुम्ही मार्ग बदलला की, लगेच त्यांच्या लक्षात येत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शॉर्टकट काढल म्हणजे मार्गच बदलविला ना, आता तुम्ही तिकडुन जाता ना. मंदिराकडुन.

**मा.आयुक्त :-** तो रस्ता सुस्थितीत करु या आपण.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२८१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./४३ दि.१८/०८/२०२० अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्रं.१२ श्रध्दा कॉलनी परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.संदेश ज्ञानदेव टेकाडे यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दरानुसार रक्कम रु.५,७२,५९२/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./४४ दि.१८/०८/२०२० अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्रं.१२ धांडे नगर मेहरुण स.नं.५६१/१ब व २क+२ड उताराचा रस्ता कॉक्रीटचा करणे कामी मक्तेदार श्री.डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा २.९९% कमीचे दरानुसार रक्कम रु.१२,२४,८४८/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./४५ दि.१८/०८/२०२० अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मेहरुण रिक्षा स्टॉप पासुन ते स.क्रं.२५८ भागापर्यंतच्या नाल्यास पुर्व बाजुस संरक्षण भिंत बांधणे कामी मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दरानुसार रक्कम रु.२४,८९,५०४/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./४६ दि.१८/०८/२०२० अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१९ मधील मेहरुण शिवार १८४/२ सुप्रिम कॉलनी येथील मनपा मालकीच्या खुल्या जागेत वॉल कंपाऊंड बांधणे कामी मक्तेदार श्री.चेतनकुमार नगिनचंद चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे दरानुसार रक्कम रु.१४,७८,८०२/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./४७ दि.१८/०८/२०२० अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्रं.०८ निमखेडी शिवार गट क्रं.८६/१ खुल्या जागेस चेनलिंक फेन्सिंग करणे कामी मक्तेदार श्री.शशिकांत गोविंद कोल्हे यांचे निविदा रक्कमेवर १०% कमीचे दरानुसार रक्कम रु.४,५६,७८६/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./४८ दि.२४/०८/२०२० अन्वये नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१३ अंतर्गत समता नगर भागात आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०.९९% कमीचे दरानुसार रक्कम रु.६,८५,८९२/- मात्र खर्चाची संविदा.

७. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/२३ दि.२५/०८/२०२० अन्वये नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजने अंतर्गत जळगांव शहरातील विविध ठिकाणी मिनी हायमास्ट पोल उभारुन त्यावर एलईडी लाईट लावून प्रकाश व्यवस्था करणे कामाचे (पार्ट I ते XXIX पार्ट) कामी मक्तेदार मिलींद इलेक्ट्रिक वर्क्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेपेक्षा ३.४७% कमीचे दरानुसार रक्कम रु.४०,२७,१३७/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./४९ दि.२६/०८/२०२० अन्वये सर्व साधारण रस्ता अनुदान अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१४ मधील इच्छादेवी चौक ते डी मार्ट मोहाडी रोड पर्यंतचा रस्ता रुंदी करण व डांबर रोड दुरुस्ती करणे कामी मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०% कमीचे दरानुसार रक्कम रु.२१,८०,०६४/- मात्र खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां.५० दि.२७/०८/२०२० अन्वये प्रभाग क्रं.१ व २ मधील रस्ते खडी व मुरुमाने दुरुस्त करणे कामी मक्तेदार श्री.संदेश ज्ञानदेव टेकाडे,जळगांव यांचे वाटाघाटीअंती अंदाजित रक्कमेप्रमाणे कमीचे दरानुसार रक्कम रु.५,९०,३४८/- मात्र खर्चाची संविदा.

१०. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./५१ दि.२७/०८/२०२० अन्वये प्रभाग क्रं.३,१६ व १७ मधील रस्ते खडी व मुरुमाने दुरुस्त करणे कामी मक्तेदार श्री.संदेश ज्ञानदेव टेकाडे,जळगांव यांचे वाटाघाटीअंती अंदाजित रक्कमेप्रमाणे कमीचे दरानुसार रक्कम रु.५,८६,३९४/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./५२ दि.२७/०८/२०२० अन्वये प्रभाग क्रं.४ व ५ मधील रस्ते खडी व मुरुमाने दुरुस्त करणे कामी मक्तेदार श्री.डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे वाटाघाटीअंती अंदाजित रक्कमेप्रमाणे कमीचे दरानुसार रक्कम रु.५,९७,२९८/- मात्र खर्चाची संविदा.

१२. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./५३ दि.२७/०८/२०२० अन्वये प्रभाग क्रं.६ व ७ मधील रस्ते खडी व मुरुमाने दुरुस्त करणे कामी मक्तेदार श्री.संदेश ज्ञानदेव टेकाडे,जळगांव यांचे वाटाघाटीअंती अंदाजित रक्कमेप्रमाणे कमीचे दरानुसार रक्कम रु.५,८७,३२२/- मात्र खर्चाची संविदा.

१३. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./५४ दि.२७/०८/२०२० अन्वये प्रभाग क्रं.८ व ९ मधील रस्ते खडी व मुरुमाने दुरुस्त करणे कामी मक्तेदार श्री.डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे वाटाघाटीअंती अंदाजित रक्कमेप्रमाणे कमीचे दरानुसार रक्कम रु.५,९०,३४८/- मात्र खर्चाची संविदा.

१४. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./५५ दि.२७/०८/२०२० अन्वये प्रभाग क्रं.१०,११ व १२ मधील रस्ते खडी व मुरुमाने दुरुस्त करणे कामी मक्तेदार श्री.संदेश ज्ञानदेव टेकाडे,जळगांव यांचे वाटाघाटीअंती अंदाजित रक्कमेप्रमाणे कमीचे दरानुसार रक्कम रु.५,९१,६३४/- मात्र खर्चाची संविदा.

१५. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./५६ दि.२७/०८/२०२० अन्वये प्रभाग क्रं.१३,१४ व १२ मधील रस्ते खडी व मुरुमाने दुरुस्त करणे कामी मक्तेदार श्री.संदेश ज्ञानदेव टेकाडे,जळगांव यांचे वाटाघाटीअंती अंदाजित रक्कमेप्रमाणे कमीचे दरानुसार रक्कम रु.५,९१,३५४/- मात्र खर्चाची संविदा.

१६. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./५७ दि.२७/०८/२०२० अन्वये प्रभाग क्रं.१५,१८ व १९ मधील रस्ते खडी व मुरुमाने दुरुस्त करणे कामी मक्तेदार दामिनी रविंद्र चौधरी,जळगांव यांचे वाटाघाटीअंती अंदाजित रक्कमेप्रमाणे कमीचे दरानुसार रक्कम रु.५,८६,३९४/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**